
माणूस
० जुलै १९७१
५० पैसे

| | | | |
|---|---|---|---|
| माणूस | शनिवार | १० जुलै १९७१ | पन्नास पैसे |
| वर्ष | अंक | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| अकरा | सहा | पंचवीस रुपये | पंचेचाळीस रुपये |

# माणूस

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

Dear Gentleman, Poona, June 25

¤ I have read in your recent issue of 'Manus' a report of an interview with one Mr. Steven Kelman, a so-called "American student leader.' I am not a person to use the word 'CIA agent' lightly, But I feel that there are some serious questions that should be asked of Mr. Kelman.

1. In just what way did he take part in the student movement ? The information given in the article was so incorrect that I would like to know what was his basis of experience.

2. Exactly what type of grant does he have from Harvard University ? I do not know of any legitimate research grant that allows a "Tour of Asia" with continual speeches given under the sponsorship of USIS and such agencies. Is he on a study tour and if so what is he studying ? The manipulation of public opinion ? Under such conditions an Indian audience has every right to ask where a person is getting his money from.

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

मुखपृष्ठ छायाचित्र : जादूगार रघुवीर यांच्या संग्रहातून.

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

Regarding the factual inaccuracies in the article, I will give one illustration. SDS ( Students for a Democratic Society ) did **not** split up into two factions but into three and it makes no sense to describe them us ' moderate ' and ' extremist. ' The first break-away group, PL ( Progressive Labour ) took a very purist class line, saying that only the working class could lead a revolution ...the lack of sympathy with the black movement and similar movements has left them relatively isolated. Then the Revolutionary Youth Movement ( which came to be called ' Weatherman ' ) took the contrary position that the " American working class was so corrupted by the spoils of imperialism and what we call ' white skin privilages " that it was hopeless, that only colonized and ' third world ' peoples could lead a revolution and that the only role for white radicals was to attempt, courageous acts of terrorism to spark a stronger movement. Their going underground in other words, was related to a despair about mass organization. But is it not a terrible indictmnet of American society that thousands of its finest youth should be driven to take this step ? -The war in Vietnam has haunted us all, and while the other radical organizations were bringing lakhs people (almost one million). to Washington with the slogan. ' Bring the troops home now', the Whaterman were taking the slogan " Bring the War hom now. " Finally, this left the third faction in SDS, the Revolutionary Youth Movement II, attempting confused forms of organization of college and working class youth. SDS has indeed split up, but it does not matter. We are building new organizations, and every time someone says ' The student move ment is dead ' it springs up again–as it did in the demnostrations in Washington last May.

But it is not worth while discussing this with Mr. Kelman since I I think he does not care. He argues that the majority of American public opinion is against the student movement, especially its ' violent ' aspects. This is true. It is also true, (read recent Time

पृष्ठ ७२ वर

# जेव्हा गिरणी बंद पडते

मंगळवारची दुपारची बाराची वेळ. पावसाळा असल्याने उन्हाची तिरीप तितकीशी जाणवत नव्हती. फोर्टमधील ओव्हल मैदानावरील हिरवळ अगदी टवटवीत वाटत होती. वाऱ्यावर ते इवलेसे गवत छान झोके घेत होते. याच गवतावर शेकडो मलूल चेहऱ्यांची माणसे बसलेली होती. रस्ताभर घोषणा करून आल्याने आता घोषणा करण्याचे त्राण त्यांच्यात असावे असे मला तरी वाटले नाही. कदाचित त्यांच्या नेत्यांचे शिष्टमंडळ महाराष्ट्राच्या मजूर मंत्र्यांच्या भेटीसाठी गेले असावे व त्यांचे पुनरागमन होताच बहुधा चांगली बातमी मिळणार म्हणून मळकट कपड्यातील पुरुष व विटक्या लुगड्यातील साध्या भोळ्या स्त्रिया आतुरतेने त्यांची वाट पहात मैदानात बसल्या होत्या. पण बिचाऱ्यांना कल्पना नसेल की, परवाच बंद पडलेली त्यांची ज्युपिटर मिल कदाचित अनेक महिने बंदच राहील.

रविवारी रात्री ज्युपिटर मिलच्या मालकांनी अचानक गिरणीत, ती कायमची बंद करण्यात येत असल्याची नोटीस लावली आणि त्या गिरणीत काम करणाऱ्या एकूण ४२०० कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. त्याच वेळी अहमदाबाद येथील ज्युपिटर मिललाही मालकांनी कायमचे टाळे ठोकून सुमारे २३ शे कामगारांना बेकारीची वाट दाखवली.

सरकार व राष्ट्रीयकृत बँकांनी कर्ज न दिल्यामुळे मिल बंद करण्याचा निर्णय घेण्यात येत आहे असे मालकांनी घोषित केले. पण महाराष्ट्र सरकार काय झोपा काढीत होते ? गेले सहा महिने या गिरणीची अवस्था रुग्णाइताप्रमाणे होती आणि काही दिवसातच ती राम म्हणणार अशी चिन्हे स्पष्ट दिसत होती. कामगारांची शिष्टमंडळे मजूर मंत्र्यांच्या कचेरीत खेपा घालीत होती, पण त्यातून दखल घेण्यासारखी कृती सरकारकडून घडली नाही व शेवटी गिरणी बंदच पडली.

पण गिरणी बंद पडायची ही काय पहिलीच वेळ नव्हे. आजतागायत अनेक गिरण्या बंद पडल्या, गंजून पडून झडून गेल्या—पडता पडता अनेकांना बेकार करून गेल्या. एवढेच नव्हे तर येत्या काही महिन्यांत एल्फिन्स्टन, मॉडर्न व इतर काही गिरण्या याच मार्गाने जाणार असल्याची दुःश्चिन्हे दिसत आहेत.

'कापसाचे भाव वाढले, सरकारने कापूस व्यापार स्वतःकडे घेतल्याने कापसाचा पुरवठा कमी होतो, कापडावरील करही अधिक वाढले.' वगैरे वगैरे, बंद पडणाऱ्या

पृष्ठ ७१ वर

**N**ow that the great buildings have collapsed, it is easier to notice the flowers among the ruins.

–Yrgo Hirn ( Finland )

रंगलेली मैफल संपावी. हत्यारं शांत व्हावीत. रसिकजन घरोघर निघून जावेत. जिथें मिनिटापूर्वी सप्तस्वरांची जादू फुलली, त्या जलसाघरात सर्वत्र शुकशुकाट व्हावा. दिवे मंद व्हावेत. आणि त्या रिकाम्या, निरव जागेत एकच श्रोता रेंगा

शतपावली

रवींद्र पिंगे

# झाबवाला

## एक (ध्येय) वेडा पारशी



ळत रेंगाळत कोपऱ्यात बसून राहिलेला असावा. काळाचं आणि कृतीचं भान नाहीसं झालेल्या त्या श्रोत्याबद्दल आपल्याला आश्चर्य वाटेल. क्षणभरच. मग तेही ओसरेल आणि दया वाटेल. परवा काळाच्या करवतीला बळी पडलेल्या झाबवालांना वीस-पंचवीस वर्षांपूर्वी प्रथम पाहताना मला त्यांची अशीच दया वाटली. वाटलं, हा वेडा पारशी जीवनाच्या धकाधकीत आवश्यकतेपेक्षा अधिक काळ रेंगाळला आहे. रेंगाळल्याबद्दलही काही म्हणणं नाही. कुरकूर नाही. देवळाच्या ओसरीत कुणीही कितीही वेळ भिंतीला पाठ लावून बसावं, तसं खाजगी जीवनात कुणीही कितीही काळ रमावं; रवंथ करावं. पण आरतीला उभं राहाणाऱ्यांनी पुष्पांजली वाहून झाल्यानंतर लोटांगण घालून परतलं पाहिजे. आरतीची सर्व गर्दी ओसरल्यानंतर एकट्यानेच टाळ्या पिटीत राहिलं तर कसं दिसेल ? आधी हसू येईल. ते ओसरेल मग दया येईल. झाबवालांची अशीच दया यायची. पिकलं पान झालेलं स्वच्छ दिसत आहे. मान डुगडुगत आहे. दृष्टीदोष वाढल्यामुळे डोळे किलकिले झाले आहेत. तेल न चोपडलेल्या केसटचा बर्ट्रांड रसेलच्या बटांसारख्या बेसुमार वाढल्या आहेत. कृश, कुडमुड्या, देहावरला जुनाट पारशी डगला सावरण्यात आणि वृत्त-पत्रांचा जाडजूड जुडगा पेलण्यात देहाचं सगळं त्राण खर्ची पडत आहे, अशा अनु-कंपनीय अवस्थेत झाबवाला फोर्ट विभागातले फूटपाथ उन्हातान्हातून तुडवत जायचे. वीस वर्षांपूर्वी ते प्रथम दृष्टीला पडले ते अशीच अशान्त भ्रमंती उरकल्या-वर चर्चगेटच्या पारशी बावडीचं पाणी घटाघटा पिताना. एका हाताने त्यांनी चिखलात भिजणारी, बीन इस्त्रीची पारशी चिचोळी तुमान वर खेचून धरली होती. काखेमध्ये वर्तमानपत्रांची आणि वकिली कागदपत्रांची जुडी दाबून धरली होती. गरुडचोचीसारख्या टपोऱ्या नाकाच्या शेंड्यावरून चांदीच्या फ्रेमचा चष्मा कोसळायला आला होता. आणि गृहस्थ एका उजव्या हाताच्या चिमुकल्या ओंजळीने बावडीचं पाणी भुरकीत होता. अर्धे पाणी खाली चिखलात घरंगळत होतं. वाटलं वणवण करीत वयाने वाकलेल्या ह्या बुढ्या बाबांना पोटभर पाणी निवांतपणे पिण्याच्या साध्या निःशुल्क सुखापासूनही ह्या जगात वंचित रहावं लागावं ? मला त्यांची दया आली. क्षणभरच.

झाबवाला मात्र जन्मभर एकच गोष्ट जाणीत होते : दया. दया हेच त्या म्हाताऱ्याच्या जीवनाचं सूत्र होतं लोक त्याला ट्रेडयुनियनवाला पारशी म्हणत. काहीजण वेडा पारशी म्हणत. पण सत्याऐंशी वर्षांची खडतर वाटचाल करताना त्याने दयेचा दिवा ओंजळीत जपून धरला होता. त्याची खूप फरफट झाली. पण ह्या जो करुणेला कधी पारखा झाला नाही. ह्या सुरतेचा पारशी. पण सारा जन्म त्याने मुंबईतल्या मराठी कामगारांची दयाप्रेरीत सेवा करण्यात खतम् केला. कामगार कल्याण हे त्याचं मिशन होतं. किंवा अधिक अचुक सांगायचं म्हणजे कामगार कल्याणाच्या पालखीचा तो एक एकाकी भोया होता.

अठराशे चौऱ्याऐंशीसाली सुरतेला गरीब शिक्षकाच्या कुळात त्याचा जन्म झाला. तापीतीरावरले सूर्याचे किरण पहात त्याचं प्राथमिक शिक्षण संपलं. सुरतेच्या म्युनिसिपालिटीच्या आणि आयरीश प्रेसबिटेरीयन मिशनच्या शाळात शिकून तो विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर, म्हणजेच एकोणीसशे एक साली मॅट्रीक झाला. त्याने त्या काळात खूप आपदा भोगल्या. सुदैवाने त्याला गाता गळा लाभला होता. त्याचा फायदा त्याने उठवला. सुरतकर पारश्यांच्या लग्नात गाणी बजावणी करून त्याने चार दिडक्या त्या विद्यार्जनाच्या अजाण काळातही मिळवल्या. ह्याच सुमारास गुजरातमध्ये भीषण दुष्काळ पडला होता. त्या कराल वारांच्या ओल्या खुणा हृदयावर घेऊन तो वकिलीच्या अभ्यासासाठी मुंबईला आला. एलफिन्स्टन महाविद्यालयातून बी. ए. झाल्यानंतर त्याने वकिलीची अर्धी परीक्षा दिली. त्यावेळी एकोणीसशे पाच साल उजाडलं होतं. दादाभाई नवरोजींचा ' स्वदेशी 'चा मंत्र आसमंतात घुमला होता. दिव्याने दिवा प्रज्वलीत होत होता.

अर्धा वकील झाल्यावर त्याच्याने स्वस्थ बसवेना. गुजरातेतल्या दुष्काळाच्या अक्राळविक्राळ आठवणींनी त्याला पछाडलं होतं. गरीब भुकेल्या रयतेचे वनवास त्याने पाहिले होते. ह्या समस्त दुःखितांच्या भाळी लिहिलेल्या शापांना वाचा फोडण्यासाठी लेखणीच हाती घेतली पाहिजे, असा हिशोब करून त्याने बी. एम. मलबारी संपादीत असलेल्या ' ईस्ट अँड वेस्ट ', आणि ' व्हॉईस ऑफ इंडिया ' ह्या मासिकांच्या संपादक वर्गात नोकरी धरली. शाबवाल्याच्या सहीखाली त्यावेळी इतका स्फोटक मजकूर प्रसिद्ध होऊ लागला की लॉर्ड रिपनने ती मासिके आपल्या मेजावर नेहमी संदर्भासाठी ठेविली जावीत असं आज्ञापत्र काढलं !

पुन्हा त्याला शिक्षक होण्याची हुक्की आली. देवळालीच्या बार्न्स हायस्कूलमध्ये त्याने पंतोजीपण पत्करलं. देवळालीच्या थंड डोंगरी हवेत त्याला साक्षात्कार झाला की प्रचलीत शिक्षणपद्धती भाकड आहे; रोपं सळसळून वर यायची असतील तर ऋषिमुनींनी गौरविलेल्या गुरुकूल पद्धतींचाच अवलंब अविलंब केला पाहिजे. योगायोग असा की त्याकाळी आग्र्याला एक गुरुकूल मौजूद होतं. तो सुगावा लागताच हा पारशी देवळालीहून थेट आग्र्याला पोहोचला. गुरुकूल पद्धतीच्या शिक्षणाचा नवा आराखडा यमुनेच्या शांत तीरावर सुरू झाला. पण कुठेतरी माशी शिंकली. एक ठोकर खाऊन तो पुन्हा नाशकाला माघारी वळला – पारशी मुलांच्या शाळेचा हेडमास्तर म्हणून.

आता एकाच खुंटाला बांधून रहाणं, दुष्काळी रयतेची गाऱ्हाणी वेशीवर टांगू पहाणाऱ्या समाजसेवक पारशाला कसं शक्य होतं ? शिवाय, लेखनबहाद्दरीतल्या नशेचा अंमल ही काय चीज आहे हे त्याला माहीत होतं. नाशकाहून त्याने गाशा गुंडाळला आणि मुंबई गाठली. क्रिकेटचे रेडिओवरून धावते भाष्य करणारे बॅ. बॉबी तल्यारखान ह्यांच्या वडीलांचं त्याकाळी मुंबईत ' पारशी अँड प्रजा मित्र '

नावाचं एक दैनिक होतं. झाबवाला त्या दैनिकाचं सहसंपादकपद भुषवू लागला. त्यावेळी अकरा साल उजाडलं होतं. मनस्वी झाबवाला सत्तावीस वर्षांचा झाला होता.

झाबवालाचं भटकं पण कार्यरत जीवन इथून सुरू झालं. गोपाळ कृष्ण गोखल्यांच्या सेवापरायण सात्त्विक तालमीत तयार झालेल्या गो. कृ. देवधरांची आणि झाबल्यांची गाठ पडली. देवधरांनी त्याला पद्धतशीर विधायक सामाजिक कार्याची दिक्षा दिली. शिष्याने गुरुंच्या कचेरीच्या समोरच मुंबईतली पहिली 'अस्पृश्य सहकारी सभा' काढली. हिंदू हरिजनांच्या कल्याणासाठी खर्ची पडणारा झाबवाल. हा मुंबईतला पहिला पारशी समाजसेवक ठरला. देवधरांनी त्याला हिंदू धर्मतत्त्वांचाही ळळा लावला. तेव्हा मुंबईतली हरिजनसेवेची उर्मी दाबून झाबवाला हिंदूधर्मतत्त्वांचा खास अभ्यास करण्यासाठी गंगेकाठी काशीला हिंदू सेंट्रल कॉलेजात दाखल झाला. काशीला बेझंटबाई आणि बाबू भगवानदास ह्या सत्त्वशील तत्त्वचिंतकांचा त्याला सहवास लाभला. सतत समाजाच्या हिताचं निरपेक्ष वृत्तीने करीत रहाणं ही जीवनदृष्टी त्याने बेझंटबाईंकडून मिळवली. अभिजात धर्मतत्त्वांचं शांत चिंतन चित्र वृत्तींना उजाळा देत हा अनुभव त्याने बाबू भगवानदासांपासून मिळवला. तो तिथेच टिकता तर तत्त्वज्ञानाच्या शाखेत खूप पुढचा पल्ला गाठता. पण एकाच तंबूत पाय आखडून बैठक मारून राहीला तर मग तो झाबवाला कसला ?

चौदासाली तिशी ओलांडल्यावर गंगेच्या शांत किनाऱ्यावरून तो मुंबईच्या गदारोळात परत आला. ह्या पुनरागमनाच्या वेळी तो हिंदी स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या 'बॉम्मे क्रॉनिकल'च्या संपादकीय खात्यात नोकरीला लागला. 'बॉम्बे क्रॉनिकल'ची कचेरी म्हणजे त्या काळी स्वातंत्र्यलोलूप वकीलांचा अड्डाच असे. तिथे होमरूलवाले बॅ बॅप्टिस्टा काका, बॅ. पवार, दिवाण चमणलाल, सॉलीसीटर जीनवाला ही कर्ती मंडळी भेटली. त्यांचा त्याला क्रीयाशील सहवास लाभला. विशेषतः, जीनवालांच्या निरलस सेवाबुद्धीने त्याच्यावर गारुड केलं. दोघेही पारशी. दोघेही दयाळू. दोघेही झपाटलेले, तशात अर्धा वकील असलेला झाबवाला रक्ताने तरुण. पायपीटीला न डगमगणारा. तो कुठल्याही सरकारी किंवा निमसरकारी हपीसात हक्काने जायचा नि कनिष्ट सेवकांना विचारायचा, 'क्यों भाई, युनियन निकालेंगा क्या ? चलो, हम मदत करेंगा ! डरो मत. होगा तो तुमारा फायदाच होगा.' पावती पुस्तकांचा जुडगा झाबवाल्यापाशी सदाचाच असे. युनियन सुरू होई. रेल्वे, पोस्ट, टेलेग्रॅफ, डॉक्स, पोर्ट ट्रस्ट, गॅस, म्युनिसिपालटी, ट्रॅमवे – त्या काळात अशी एक सेवा नव्हती की झाबवाला युनियनच्या निमित्ताने तिथे पावती पुस्तकांचा जुडगा घेऊन थडकला नसेल. ह्या प्रत्येक खात्यातलं पहीलं ट्रेड युनियन झाबवालाच्या लटपटीने आणि तळमळीने उभं राहिलं. विशेष म्हणजे ट्रेडयुनियनचं

नावही लोकांना माहीत नव्हतं त्या काळात झाबवाल्याने ही घडी घातली. पोस्ट-मनांचा पहिला संप सोळा साली झाबवाल्यानेच घडवून आणला. इतकंच नव्हे, तर संघटना नावाची काही वस्तू असते ह्याची गंधवार्ताही नसलेल्या घोडागाडी चालवणाऱ्या कंगाल हाक्यांना त्यानेच पहिलं युनियन काढून दिलं. रात्री अपरात्री तारा पोहोचवून देणारे लाल सायकलवाले तार कामगार कुणाच्या खिसगणतीत होते? झाबवाल्याने त्यांच्यासाठी संघटनेचं निशाण उभारलं. गिरणी कामगार युनियनमुळे वीस सालानंतर डांगे, निमकर, मिरजकर, तालचेलकर, जोगळेकर, शौकत उस्मानी, शृंगरवेलू, घाटे, फिलीप स्प्रॅट ही कामगार कार्यकर्त्यांची लाट उभी राहिली. पण त्यांच्या खूप अगोदरपासूनच झाबवाला परळच्या गिरणी कामगारांच्या चाळीतून थाळी वाजवीत फिरत होता. स्वत: थाळी वाजवायची, नाउमेद कामगारांना गोळा करायचं, संघटनेचं महत्त्व आणि एकजूटीचं मर्म त्यांना धेडगुजरी पारशी मराठीत सांगून रक्त आटवायचं, त्यांनी ऐकलच तर कृतकृत्य होऊन रात्री-बेरात्री घरी परतायचं आणि गोखल्यांची सालस सर्व्हंटस ऑफ इंडीया सोसायटी, गो. कृ. देवधरांची दानत आणि जोनवाल्यांची जिद्द यांचं स्मरण करून झोपायचं, असा त्याचा खाक्या होता. विशेष म्हणजे झाबवाला कामगारांना युनियन काढून द्यायचा, पाळणा जोजवायचा. त्यानंतर तो दुसरं युनियन काढायला मोकळा व्हायचा. त्यामुळे झाबवाल्याने काढून दिलेल्या प्रत्येक युनियनचा कबजा दुसरा कुणीतरी घेई. जी. आय. पी. चं पहिलं युनियन झाबवाल्याने काढलं. कम्युनिस्टांनी त्याचा कबजा घेतला. बी. बी अँड सी. आय. चं पहिलं युनियन झाबवालाने उभं केलं. त्याचा कबजा जमनालाल मेहेताने बळकावला. म्हणजे सगळं रक्त आटवून पुन्हा झाबवाल्याच्या पंजाखाली असं एकही युनियन राहिलं नाही. अर्थात, त्याची त्याला खंतही नव्हती. कारण तो सत्ताभिमुख नव्हता. केवळ भूतदयावादी होता. एकवीस सालचा गिरणी कामगारांचा पहिला संप भाटवडेकर आणि मयेकरांनी घडवून आणला, झाबवाला त्यांच्या छत्रीत होताच. दरम्यानच्या काळात आर्यसमाजाच्या स्वामी श्रद्धानंदांचा खून झाल्याबरोबर पिसाळलेला झाबवाला खरं-खोटं काय आहे ते प्रत्यक्ष पाहाण्यासाठी दिल्लीला मुक्काम करायला गेला. वास्तविक, झाबवाल्याचा आणि आर्यसमाजाचा काडीइतकाही संबंध नाही. पण स्वामीजींनी गुरुकूल काढलेलं होतं. आणि गुरुकूल हा झाबवाल्यांचा दुखरा दात होता. गुरुकूल म्हटल्याबरोबर तो विरघळे!

तिकडे रशियात लाल क्रांती झाली. इकडे वारं फोफावलं. ह्यांची फुफ्फुसं स्फुरू लागली. कामगार कल्याणाचं ध्येय असणारी सत्ता पृथ्वीवर उदीत झाली. ह्याच्या झाबवाल्यांना पुन्हा पुन्हा उकळ्या आल्या. त्यांनी ठेंगडी, मिरजकरांबरोबर भारतातला पहिला शेतकरी-कामकरी पक्ष स्थापन केला. ठेंगडी अध्यक्ष, मिरजकर चिटणीस आणि झाबवाला उपाध्यक्ष, अशी दिंडी उभी राहिली. भारतातला मे-दिनाचा

पहिला सोहळा पंचवीस साली झाबवालांनीच सर्वप्रथम केला. सायमन कमिशनला ठोस विरोध केला. स्टॅन्ले रिडस् कमिशनपुढे आणि आल्फ्रेड नॉईस इन्क्वायरी कमिटीपुढे कामगारांच्या बाजूने साक्षी दिल्या. ह्या कामगारविषयक कळवळ्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. म्हणजे ब्रिटिश सरकारची वक्रदृष्टी झाली. मिरत कटात त्यांचे नाव नोंदण्यात आले. तीन वर्ष जेलमध्ये बेडी पडली आणि अखेरीस सर्व आरोप नाशाबित होऊन तेहतीस साली कारावासातून त्यांची मुक्तता झाली. त्याने व्यासंग आरंभला. गीता अभ्यासली. पुढे गीतेवर ग्रंथ लिहून भारतीय विद्याभवनाचं सुवर्णपदकही मिळवलं.

पुन्हा त्याने ना. म. जोशी, रा. ब. बोले ह्यांच्याबरोबर सांधा साधण्याचा प्रयत्न केला. पण दिवस बदलले होते. राजकीय पक्षोपपक्ष पवित्रे टाकून कामगारांच्या कल्याणाची भाषा बोलू लागले होते. झाबवाल्यांना राजकारणात रस म्हणून कसा तो नव्हताच. एफ वॉर्ड काँग्रेस कमेटीचे अध्यक्षस्थान त्यांनी भुषवून पाहिलं. पण राजकीय पक्षांची नि त्यांची कुंडली जुळेना. बरं, राजकीय पक्षांनाही त्यांच्या नावाचा अंगारा न लावणारा कार्यकर्ता नको होता. पुढे बाकीचे संघटीत पक्ष चातुर्याच्या जोरावर बाहुबली ठरले आणि निरलसतेची उपासना करणारे झाबवाला बाहुलीसारखे दूर फेकले गेले. त्यांच्यापरीने ते शे-दोनशे कामगारांची युनियनं कळवळ्यांनी काढीत. राजकीय पक्षांची लठ्ठालठ्ठी होई. त्यांचे पक्षनिष्ठ कामगार कार्यकर्ते युनियनांचा कबजा घेत. झाबवाला नवी युनियनं काढायला मोकळे होत. टॅक्सी ड्रायव्हर्सचं युनियन त्यांनी काढलं. ग्रंथालय सेवकांचं युनियन त्यांनीच काढलं. सरकारी नोकरीतील शिपायांचं पहिलं युनियनही त्यांचंच. पण कुठेही त्यांचा पाय स्थिर म्हणून कसा तो राहिला नाही. देवळाच्या सभामंडपात कोपऱ्यात जळत राहाणाऱ्या समईसारखे झाबवाला मंद प्रकाशाची अस्थीर वलये फुलवीत एकाकीपणे उभे राहिले.

अशी एकांडे शिलेदारीची पंचवीस वर्षे त्यांनी पोटतिडीकीने काढली. उत्तरायुष्यात कुणीही त्यांना जवळ केलं नाही. किंवा, ते टिकले नाहीत असं म्हणा. पण कामगारांच्या अर्जांचा ढीग घेऊन त्यांची अधिकाऱ्यांमार्फत सनदशीरपद्धतीने दाद लावून घेण्याच्या त्यांच्या व्रतात, एका दिवसाचाही खंड कधी पडला नाही. ते खारला स्वतःच्या घरात राहात. वास्तूचं नाव त्यांनी ठेवलं होत 'Hermitage.' म्हणजे 'मठ.' झाबवाला मठवाशी होते. आजूबाजूचे लोक त्यांना 'फकीर' म्हणत. हा फकीर आपल्या मशिदीतून रोज सकाळी बाहेर पडायचा. उद्देश : कामगारांच्या रास्त गाऱ्हाण्यांची नेमस्त मार्गाने दाद लावून देणे आणि जमल्यास जाता जाता एखाद्या युनियनचा लाल बावटा फडकाविणे. हो; आठवण झाली म्हणून सांगतो : ह्या धावपळीतसुद्धा ह्या म्हाताऱ्याने मोजून तीस ग्रंथांचं लेखन केलं !

अशा ह्या लाल बावटेवाल्याची गृहस्थिती कशी होती ?

सांगतो.

हा पारशी हाडाचाच गरीब. नोकरीत धड पाय नाही. लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यात ह्याची उमेद सरलेली. ह्याला पारशांमध्ये सुखासुखी कोण मुलगी देणार. पण हा नशिबाचा शिकंदर ठरला. फिरोजशहा मेहेतांच्या श्रीमंत पुतणीचा ह्याच्यावर जीव जडला. समस्त पारशी समाज नको–नको म्हणत असता तिने ह्या फिरत्या फकीराच्या गळ्यात माळ घातली. एका रात्रीत हा धनवान झाला ! पण झाबवाल्यांचा धर्म वेगळा होता. आपल्या वाटणीला आलेल्या संपत्तीचा धर्मदाय करून त्याने आपल्या पारशी दानतेचा झरा वाहता ठेवला. ह्याला सात मुलं झाली, सत्तावीस नातवंड झाली. सातही मुलं पराक्रमी ठरली. एक मुलगा जिनेव्हाला युनायटेड नेशन्समध्ये अंमलदार आहे. दुसरा न्यूयॉर्कला तंत्रज्ञ आहे. तिसरा दिल्लीचा बडा आर्किटेक्ट आहे. दिल्लीचं सुपर मार्केट त्यानेच बांधलं. हल्ली आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविलेली इंग्रजी लेखिका प्रावर झाबवाला ही ह्या आर्किटेक्टचीच बायको आणि बुढ्ढ्या झाबवाल्यांची सुनबाई. मुलंमुली वॉशिंग्टन, मॅसॅच्युसेटस्ला शिकली. सर्वच नातवंड तल्लख आहेत. झाबवाल्यांची घरवाली अखिल भारतीय महिला परिषदेची अध्यक्षा होती. गुदस्ता ती गेली.

अशा गोकुळात झाबवाला फकीरासारखा वावरला. सर्व मुलामुलींच्या मोटारी होत्या. पण ह्याने चुकूनही मोटारीत पाय टाकला नाही. ह्याने जन्मभर एक रेल्वेचा पास जवळ बाळगला. रोज सकाळी पास खिशात घालून तो मनमुराद जनतासंपर्क साधत-साधत चर्चगेटला यायचा. तिथे चार आण्याचे चणे चुरमुरे घ्यायचा. अर्धे उभ्या उभ्या भर रस्त्यात खायचा. अर्धे चर्चगेटवरल्या भिकाऱ्यांना व्रत म्हणून आनंदाने वाटायचा. पारशांच्या बावडीवरलं पाणी पियाचा. मग तुमानीला हात पुसून फोर्टमधले सगळे जिने तुडवायचा. दमला की वाहत्या वर्दळीत कमरेत वाकून उभा राहायचा. लोकांना वाटायचं हा आणखी एक वेडा पारशी आहे ! तशांत अलीकडे त्याला श्वेतकोडानं पिडलं होतं. अंगावर पांढरे डाग घेऊन आपला जराजर्जर देह तो फरफटवीत असे. बगळ्यासारखी मान उंच करून ओळखीचे चेहेरे दिसतात काय ते धुंडाळीत असे. रात्र उतरली की गाडी पकडून ' मठा ' त परते. गेल्या वर्षापासून त्याचं तेही फिरणं थांबलं. गेल्या पंधरवड्यांत तर त्याने आपला अवतारही आटोपता घेतला. त्याच्या मरणाचं त्रोटक वृत्त वाचलं तेव्हा पुन्हा एकदा मला दया आली. मात्र त्याची नव्हे. खुद्द माझीच. कारण लाखवेळा तो पिसाट लोकसेवक माझ्या अंगावरून गेला असेल; पण त्याच्याशी उबदार हस्तांदोलन करण्याचं मला एकदाही सुचलं नाही. अर्थात, आम्ही वेगळे. तो वेगळा. झाबवालांचा जन्म म्हणजे श्रमिकांबरोबर केलेलं एक उमाळ्याचं प्रदीर्घ हस्तांदोलनच होतं.

□ □ □

सौ. तारा पंडित

# हे कलकत्ता

## गो स्लो...

संपूर्ण भारतातील नक्षलवाद्यांनी आपल्या हालचालींचे प्रमाण कमी करून टाकण्याचे ठरविले आहे असे ऐकण्यात येते. त्यांच्या निकटच्या संबंधितांनी सांगितले की पार्टीच्या सूत्रधाराने भिन्न राज्यातील कार्यकर्त्यांना आपल्या हालचाली तात्पुरत्या कमी करा असा आदेश दिला आहे. असा निर्णय घेण्याची कारणे काय म्हणून विचारले असता अनेक कारणे आहेत असे उत्तर मिळाले. त्यापैकी एक कारण म्हणजे निवडणुकांमधील इंदिरा गांधींचा विजय हे होय. त्यांचे म्हणणे असे की इंदिरा गांधींनी समाजवाद आणण्याचे वचन दिले आहे व गरिबी हटविण्याचे प्रयत्नही त्या करणार आहेत. तेव्हा त्यांचे कार्यक्रम अस्तित्वात येण्यास आपण थोडा वाव द्यावा व त्या काळात इंदिराजी आपली वचने कितपत पाळतात याचे निरीक्षण करावे.

दुसरे असे की, श्री. कानू सन्याल व श्री. चारु मजुमदार ह्यांचे आपापसात काही मतभेद झाल्याचेही कळते. एकाचे म्हणणे हीच योग्य वेळ आहे आपले कार्य जोमाने सुरू करण्याची; दुसरा म्हणतो अजून योग्य वेळ आलेली नाही.

बांगला देशातील घटना देखील काही अंशी नक्षलवाद्यांच्या हालचाली थोपवून धरण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पार्टीच्या काही सभासदांनी वर्गशत्रूंवर हल्ला करण्याऐवजी व्यक्तिगत शत्रूंचेच खून पाडण्यास सुरुवात केली व त्यामुळे पार्टीच्या नांवाची बदनामी झाली.

अशा अनेक कारणांमुळे नक्षलवाद्यांना go slow वृत्ती स्वीकारावी लागली !

## दोषांचे खापर माथी आले

नक्षलवादी नेता श्री. चारु मजुमदार यांनी ' देशव्रती ' मधील लेखातून आपल्या अनुयायांना, त्यांनी वैयक्तिक खून करू नये असे आवर्जून सांगितले आहे. आजच्या वर्गयुद्ध (Class–war) माजलेल्या परिस्थितीत वैयक्तिक खून करणे इष्ट नव्हे असे त्यांनी त्या लेखात म्हटले आहे.

नेत्याचा हा आवाज त्याच्या अनुयायांना ऐकू आल्याचे अजून तरी दिसत नाही, किंवा निकटच्या भवितव्यात तिकडे लक्ष दिले जाईल असेही वाटत नाही. पश्चिम बंगालमध्ये वैयक्तिक खून पाडणे सुरूच आहे. जरी खुनी हाती सांपडत नसले तरी बरेचसे खून नक्षलवाद्यांकडूनच झाले आहेत ही गोष्ट खोटी नव्हे.

आता दुर्दैवाची गोष्ट अशी की नक्षलवाद्यांची खून करण्याची कुशलता अवांतर पक्षांनीही अंगिकारली असून तिचा सर्रास उपयोग करण्यात येतो. दोषाचे खापर मात्र नक्षलवाद्यांच्याच डोक्यावर फुटते !

उत्तर कलकत्यात झालेले अनेक व्यक्तींचे खून नक्षलवाद्यांनीच केले असे ठासून सांगण्यात आले. त्यातच हेमंत बसू आणि नेपाल रॉय यांच्या खुनांचाही समावेश करण्यात आला. परंतु ह्या दोन्ही अमानुष खुनाबाबत नक्षलवाद्यांनाच दोष देण्याइतकी पुरेशी कारणे उपलब्ध नाहीत.

नक्षलवाद्यांचे वर्चस्व असलेल्या भागातच त्यांचे हात रक्ताने माखलेले दिसणार नाहीत. याचा अर्थच असा की अहिंसेवर विश्वास न ठेवणारी दुसरी एखादी पार्टी खुनाच्या तंत्रांचा बेमालूम उपयोग करीत असून नक्षलवाद्यांवरच दोष लादीत असली पाहिजे.

आता वैयक्तिक खून पाडण्याचे काम नक्षलवाद्यांव्यतिरिक्त इतरांनीही सुरू केले असून समाज बदलण्याच्या उद्देशाने मात्र ते क्वचितच केले जाते !

## गरिबी हटाव...

एका ' बोन्धू 'चे आगमन.

' आशून, आशून, '—मी.

' नोमोश्कार. '

' नोमोश्कार. '—मी प्रतिनमस्कार केला.

' की खॉबोर ? '—मित्राने विचारलं.

मग गप्पांना सुरुवात झाली. मी सांगितलं नुकतेच आम्ही सर्वजण सोमनाथ कँपला जाऊन आलो म्हणून. कसा झाला कँप ? काय काय कार्यक्रम झाले ? इत्यादि प्रश्न त्याने उत्सुकतेने विचारले म्हणून मीही सर्व सविस्तर सांगण्यास सुरुवात केली.

' ......तसेच ' गरिबी हटाव ' ह्या विषयावर दोन सुन्दर भाषणे झाली...' असं मी म्हटलं अन् इथे त्याने मला अडवलं. म्हणाला,

' माहीत आहे ! ' गरिबी हटाव ' म्हणून सगळे ओरडतात. पण आश्चर्य हे की जे असं ओरडताना आढळतात त्यांना गरिबी काय आहे हे माहितच नसतं, मग ते ती हटवणार तरी कशा ? म्हणून मी असं सुचवू इच्छितो की ' गरिबी हटाव '

अशा घोषणा बंद करून 'अमीरी हटाव' अशा घोषणा सुरू कराव्यात...काय? कशी वाटते कल्पना?'

माझी मान नकळत होकारार्थी हलली. यावर वाद घालण्यासाठी माझ्याजवळ शब्द नव्हते!

## बाँबचे विविध उपयोग

बाँब फक्त फेकण्यासाठीच असतात असं समजू नका. कधीकधी त्यांचं नुसतं प्रदर्शनही लोकांजवळून पैसे उकळण्यासाठी पुरेसं असतं. कलकत्याच्या पूर्व भागात राहणाऱ्या एका गृहस्थाकडे विशीतले काही तरुण आले. त्या सर्वांनी ड्रेन पाईप पँट्स् घातल्या होत्या. म्हणाले,

'वर्गणी द्या. चटकन्.'

'कशासाठी?'—त्या गृहस्थाने आश्चर्याने विचारे. एका पोराने खिशात हात घालून एक काळसर रंगाचा, तागाच्या धाग्यांनी लपेटलेला गोळा बाहेर काढला. हातात खेळवीत म्हणाला,

'ह्याच्यासाठी. बघा हं. नाहीतर सौदा फार महागात पडेल.'

वर्गणी घेऊन जाताजाता ती पोरे म्हणाली की, दिलेली वर्गणी पुरेशी नव्हती. 'आम्ही पुन्हा एक महिन्याने येऊ, समजलात.' अशी धमकी देऊन ती चुले निघून गेली.

## बी. एन्. व्ही. पी.

सायंकाळची वेळ होती. दार वाजले म्हणून मी जेवता जेवता उठून, कोण आले ते बघायला गेले. बाहेर काही अपरिचित तरुण उभे होते. मला दारात पाहताच एकाने हातातला पैशांचा डबा खळ्ळकन् वाजवला. त्या पार्श्वसंगीताबरोबर 'वर्गणी द्या.' हे शब्द उच्चारले.

'कशासाठी?'

'बांगला देशसाठी. आम्ही BNVP चे कार्यकर्ते आहोत.

'BNVP?' रस्त्याने जाताना भिंतीवर ही अक्षरे वाचल्याचे आठवले. त्याचं स्पष्टीकरणही जाणून घेतलं होतं. BNVP म्हणजे बेंगॉल नॅशनल व्हॉलेंटीयर पार्टी एवढा अर्थ कळला होता. पण ह्या पार्टीचं ऑफिस नक्की कुठे आहे, पार्टी कोणते विशिष्ट काम करते वगैरे काहीच माहीत नव्हते. म्हणून आम्ही दोघेही उत्सुकतेने त्या तरुणांना त्याबद्दल विचारू लागलो. ते म्हणाले,

'आम्ही दिवसा शिक्षण अथवा नोकरी करून उरलेला सर्व वेळ ह्या पार्टीचे

काम करतो. यात आम्हाला पैशांच्या दृष्टीने मुळीच फायदा नाही. तरीदेखील आम्ही स्वयंसेवक म्हणून राबतो. आमचा वेळ देतो. सेवाभावाने काम करतो... हे आमच्या पार्टीचे पत्रक. यातून तुम्हाला सर्व काही कळेल व आम्ही कोणत्याही राजकीय गटाशी संलग्न नाही हेदेखील कळेल. आमचे काम शुद्ध निःस्वार्थी हेतूने चालते.'

मी पत्रक पाहू लागले. एकजण म्हणाला, 'ते तुम्ही सावकाश वाचत बसा. वर्गणी देऊन टाका नि आम्हाला मोकळं करा.'

'किती पैसे द्यायचे ?' –ह्यांनी पृच्छा केली.

'पाच रुपये फक्त '

'पाच रुपये ?' –मी आश्चर्याने उद्गारले.

आता दुसरा एकजण बोलू लागला–'असं पहा. बांगला देशचा विजय म्हणजेच बंगालचा विजय. आणि भारत तर बंगालशिवाय जगणेच अशक्य. आता आम्ही ही अशी निरपेक्ष सेवा करतो आहोत, आमचाही काही विचार व्हायला हवा. अखेर आपल्यासारख्यांच्या औदार्यावरच आमची पार्टी अवलंबून आहे. तेव्हा कृपा करून वर्गणी द्या–

बांगला देशसाठी–बंगालसाठी–आणि BNVP साठीसुद्धा.'

मी दोन रुपये त्यांचे हाती टिकवले. 'उरलेले तीन रुपये नंतर देऊ, तुम्ही आठ दिवसांनी या, पैसे नक्की मिळतील.' असे ह्यांनी आश्वासन दिले. मुले निघून गेली.

BNVP च्या नावाने काढून ठेवलेले तीन रुपये माझ्या पर्समध्ये अजूनही तसेच आहेत. BNVP चे स्वयंसेवक पुन्हा दिसलेच नाहीत आणि आता भिंतींवर झळकणारी अक्षरेदेखील लोप पावली आहेत.

□ □ □


# व्होल्गा जेव्हा लाल होते

ले. : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन



# अंधार कथा

अविनाश जोग

**मा**झे आणि अंधाराचे फार जवळचे संबंध आहेत. अगदी लहानपणापासून. लहान मुले अंधाराला भितात. पण दिवसापेक्षा रात्र आणि उजेडापेक्षा अंधारच मला फार प्रिय वाटे. रात्री बाराला पारसनाथाच्या टेकडीजवळ जाऊन धडधडत

जाणारी एक्सप्रेस पाहिली की फार आनंद होई. मला अंधाराशी मिसळून वागण्यात, त्याच्यावर चर्चा करण्यात आणि अंधारकाव्ये लिहिण्यात फार आनंद वाटे.

आणि पुढे माझे शिक्षणही अंधारातच झाले. मी नववीत असेन त्यावेळी. कसल्याशा दंगलीत माझे वडील मारले गेले आणि त्या धक्क्याने आईही हे जग सोडून गेली. दोन भावंडांची जबाबदारी माझ्यावर पडली. आणि मग दिवसा नोकरी आणि रात्री नाईट स्कूलला जाणे हा क्रमच पडून गेला.

आता मी तीस वर्षाचा आहे. शिक्षण अर्ध्यावरच सोडले. कर्ज उभी केली आणि संध्येचे लग्न करून दिले. छान मिळाला जोडीदार तिला. सुभाष आता मॅट्रिकला आहे. खूप अभ्यास करतोय. फर्स्टक्लासमध्ये तो येईल अशी त्याची स्वतःची खात्री आहे.

पुना-बंगलोर राष्ट्रीय हमरस्त्यावर माझे आयुष्य चालले आहे. येथे अंधाराचे आणि माझे संबंध फार घनिष्ट झाले. संध्याकाळी सातच्या सुमाराला पुणे सोडायचे. रात्री दोनला कोल्हापूर. तेथेच जमल्यास मुक्काम, नाहीतर सकाळी बेळगाव गाठायचे. तेथून रात्री बाहेर पडायचे. तिसऱ्या रात्री बंगलोर. मी दिवसा प्रवास टाळतो. का ? कोण जाणे. रात्रीच्या प्रवासात एक वेगळेच थ्रिल आहे. शिक्षण व अवांतर वाचनामुळे माझ्यासारख्या ट्रकड्रायव्हरच्या ह्या कथनात बरेच जड शब्द आलेले आहेत.

अंधार माझेशी अगदी चिकटून आहे. मी आतापर्यंत पुण्याजवळच्या छोट्या छोट्या मार्गावर रात्री ट्रकने खूप प्रवास केला आणि अलीकडेच पुणे-बंगलोर सर्व्हिसवर आहे. बऱ्याच परिचयानंतर अंधाराचे अनेक पैलू माझ्या नजरेत आले काही वेळा मी हरखलो आणि काही वेळा भीतीच्या समुद्रात बुडालो.

त्या रात्री मी साखरवाडी नावाच्या एका गावी ट्रकने चाललो होतो. ह्या खेपेला मालकानी दिलेला क्लीनर अगदीच घुम्या होता. रात्रीची वेळ. नुसता ट्रकच्या इंजिनचा आवाज. शेजारी हा अबोल क्लीनर. रस्ता भराभरा मागे पडत होता. सुसाट वारा. मन्नाट अंधार. आडमार्ग असलेले मैल न् मैल. एखादे वहानही दृष्टीस पडायचे नाही. साखरवाडी आता पंधरा-वीस मिनिटांच्या रस्त्यावर राहिली होती.

मी चकितच झालो. भररात्री एक माणूस रस्त्याच्या मध्यावर उभा होता. मी वेग कमी केला. ट्रकच्या प्रखर प्रकाशात ती व्यक्ती उजळून गेली. आता त्याच्यामध्ये आणि ट्रकमध्ये तीस फूट तरी अंतर असावे. मी हॉर्न वाजवला. तो ढिम्म तसाच उभा. मी गिअर बदलला. ॲक्सिलेटरवरचा पाय काढला. गाडीचा वेग कमी होऊ लागला.

"अरे ब. थांबू नको," क्लीनर प्रथमच तोंड उघडून बोलला.

"का ?" मी आश्चर्यचकित झालो. "गाडीखाली काय ठार मारायचाय काय त्याला ?"

"मी सांगतो ऐक."

"गप" म्हणत मी ब्रेक जोरात दाबला. गाडी त्या व्यक्तिनजीक येऊन थांबली. आणि काळजाचा एक ठोका चुकला.

त्या जागी आता कोणी नव्हते.

सगळ्या शरीराला घाम फुटला. मी घड्याळ पाहिले. एक वाजून गेला होता. भन्नाट अंधार. आज अमावास्या. मी गिअर बदलला. अफाट वेगाने आमची मर्सिडीस रस्ता कापू लागली. ते ठिकाण दिसेनासे झाले. पण त्या अंधार-स्मृती...

त्या रात्री मी साखरवाडीचा मार्ग कापत होतो. पहिला अनुभव जमेस असल्यामुळे रात्री अकराच्या पूर्वी ते विवक्षित ठिकाण पार करावयाचेच असा निश्चय होता. त्याप्रमाणे रात्री दहाला ते ठिकाण पार पडले. साखरवाडी गावचे दिवे लांबून दिसू लागले होते.

ट्रक सुसाट धावत होता. गडद अंधार. काळजची एस. टी. पिकअप शेड दिसू लागली. आता फक्त चार मैलाचाच काय तो प्रश्न. मी ॲक्सिलेटर दाबला. आणि क्लीनरला जागे केले. बेटा दोन तासाच्या प्रवासातसुद्धा डुलक्या घेतो. ट्रक धावतच होता. बराच वेळ झाला तरी साखरवाडी येईना. आश्चर्य वाटले. घड्याळ बघितले. पहाटेचे पाच वाजले होते. मला आठवत होते, मी काळजला घड्याळ पाहिले. त्यावेळी दहा वाजले होते. पहाटेचे सव्वापाचपर्यंत मी ट्रक चालवली आणि मग साखरवाडी दृष्टिक्षेपात आली. सहाला ट्रक फॅक्टरीच्या जवळ थांबवली.

चहा पिता पिता हा विषय निघाला. निघाला म्हणजे मीच काढला. तेव्हा हॉटेल मालक आमच्याजवळ आला. विशेष गिऱ्हाईक नसल्याने तो इतका वेळ आमचे संभाषण ऐकत होता. आणि त्याने जवळ येऊन आम्हाला जे काही सांगितले ते ऐकून मी सर्दंवलोच. काळजजवळचा भाग भुतांचा भाग म्हणून प्रसिद्ध आहे. अनेक जण तेथे चक्री फेऱ्यात सापडले आहेत. माणूस खूप चालतो पण वाट सरत नाही. पुन्हा त्याच ठिकाणी येतो. काल अमावास्या होती. आमचा ट्रक त्या फेऱ्यात सापडला.

"मी अरविंद शर्मा," त्या प्रसन्न चेहऱ्याच्या गृहस्थाने मला नमस्कार केला. मी प्रतिसादादाखल उलट नमस्कार केला.

"मी उत्तर प्रदेशातनं आलोय. आमच्या शेजारी मराठी कुटुंब असल्यामुळे मलाही बऱ्यापैकी मराठी बोलता येते. मी भुतांवर माहिती जमवतोय."

"बरं," मी म्हटले.

"आणि तुम्हा ड्रायव्हर लोकांना रात्रीच्या प्रवासामळे निरनिराळे अनुभव येत असतील. हे अनुभव गोळा करून, त्यातील सत्या-सत्यतेविषयी पडताळा पाहून मी संशोधन करणार आहे. तुम्ही मदत कराल?"

"हो, अवश्य." आम्ही पाचही जण बोललो.

"गुड," तो वेटरकडे वळला, "सहा स्पेशल चहा दे." चहा समोर आला. "आता सांगा अनुभव."

"त्या रात्री आमोशा होती. मी आणि किन्नर हणम्या लॉरी चालवत होतो." महादू सांगू लागला. अगदी अशुद्ध बोलतो हा. "बाराच्या सुमारास एक बाई रस्त्यात मधे आली. ती रडत होती. मी त्या वेळी नवीनच. मी गाडी थांबवली. मी आणि किन्नर उठलो.

"ए बया, काय पाहिजे गो?" मी विचारले. ती रडू लागली. "माझा लेक शीक आहे. जवळच्या डागदरकडे पोचवता?"

मी विचारले, कोणत्या गावी न्हायचे?

शेजारच्या सिदवाडीत हो, तिने उत्तर दिले. मी आणि किन्नर तिच्याबरोबर तिच्या जवळच्या झोपडीत गेलो. झोपडीत दुसरं कोन बी नव्हतं. मी तापाने जळणाऱ्या पोराला घेतले आणि आम्ही गाडीजवळ आलो. मी पोराला वरच्या सीटवर झोपवले. ती बाई म्हणाली, थांबा, दार बंद करून येते. आणि ती त्या पायवाटेवरून जंगलात गेली. दहा मिटं झाली, पंधरा मिटं, अर्धा तास पत्ता नाही. कीन्नर चिडला. त्याने ट्रकचे दार उघडले आणि खाली उतरला. "चल बे, तिला आणुया." आम्ही दोघे त्या जंगलात शिरलो.

आणि तेथे काहीही नव्हते.

"मग तुम्ही काय केलेत?"

"मग परत आलो. ट्रकचे दार उघडले आणि पहातो तो..."

"पोरगा गायब." त्याच्या किन्नरने वाक्य पूर्ण केले.

जवळजवळ दोन तास अरविंद शर्मा सगळ्यांचे अनुभव लिहून घेत होता. आम्हाला प्रश्न विचारत होता आणि त्या सर्वांतून योग्य ते बाजूला काढत होता. माझे अनुभवकथन आणि शुद्ध भाषा यामुळे तो माझ्यावर खूष झाला.

"तुम्ही कुठं उतरलाय?" मी विचारले.

"इथेच, कोल्हापुरात. तुमच्या कोल्हापूरला किती फेऱ्या होतात महिन्यात?"

"सात–आठदा तरी आम्ही कोल्हापूरला येतो महिन्यातनं. काही वेळा मात्र गावात न शिरता परस्पर बेळगावकडे जातो. तुम्ही कुणाकडे आलात?"

"मी शिवाजी विद्यापीठासमोरच्या कॉलनीत जाधवांच्याकडे उतरलोय. माझी मोटार दुरुस्त झाली की उद्या जाणार."

"बरं, पण शर्माजी, तुमचं भुताबद्दल मत काय ?"
"मत ? म्हणजे ?"
"भुते आहेत की नाहीत ?"
"झूट. भुते झूट. अजिबात झूट." शर्मानि उत्तर दिले.
"आँ ?" मी आश्चर्यचकित झालो. भुतांवर विश्वास नाही आणि भूतांवर संशोधन करतोय ! वेडाच आहे.
"मग तुम्ही भुतांवर माहिती का जमवताय ?" मी विचारले.
"ह्या माहितीतून मी भुते आणि अफवा यांच्यावर पुस्तक लिहिणार आहे आणि भूतांचे थोतांड जगासमोर मांडणार आहे.
"वा रे बेटा" मी मनातल्या मनात म्हटले.

आज अमावास्या. रात्री गाडी सोडायची. मी देवाला नमस्कार केला. गॅरेज गाठले. ट्रक दुरुस्त झाला होता. क्लीनर म्हणून आज रामू होता. मला रामू फार आवडतो. माझ्यापेक्षा त्याचे भुतांचे अनुभव जास्त आहेत.
"आज डेंजरस रे," रामू सांगू लागला, "अमावास्या। नीट गाडी हाण. विद्यापीठासमोर तर व्यवस्थित हं."
"का रे ?" मी विचारले.
"तेथे आहे," रामूने उत्तर दिले.
"काय ?"
"काय काय ? भूत. एक माणूस रस्त्यात उभा राहून रस्ता अडवतो. थांबायचे नाही,"
"छे रे बाबा. असे कित्येकजण गाडीखाली घातलेत. काय पण नसत रे ते. माणूस असतो. गाडी त्याच्यामधनं जाते."
"सांगितलं बाबा. नाहीतर गेल्यावेळचा ड्रायव्हर युसूफ, धक्क्यानंच मेला."
"बरं" म्हणत मी ट्रकचे बॉनेट पुसू लागलो. चपट्या नाकाची लेलॅण्ड. पद्धत म्हणून बॉनेट म्हणायचे.
रात्री बाराला मी गाडी चालू केली. कावळा नाक्यावरून वळून गाडी हम-रस्त्याला धावू लागली. रेल्वे क्रॉसिंग ओलांडले. विद्यापीठाच्या दिशेने गाडी पळत होती.
विद्यापीठाचा परिसर दिसू लागला.
"जपून," रामू म्हणाला.
मी चक्रावलोच. वळणावर एक माणूस, अंगात मॅनिला आणि पॅंट, हात उंचावून थांबण्याची खूण करीत होता. मी व्हीलवरचा हात स्थिर केला. समोरच्या झाडावर

एक फियाट आदळली होती. " रामू, अपघातातल्या माणसाला मदत करायची ?' मी ब्रेक दाबीत विचारले.

" गप. ती मोटार झूट आहे. वेग वाढव. थांबू नकोस. " रामू म्हणाला. भन्नाट वारा आत घुसत होता. मी प्रकाश प्रखर केला. तो माणूस रस्त्यात उभाच होता. माणूस ? भूत ते. भ्रामक शरीर. माणसांना फसवायचा सापळा.

मी गिअर बदलला. ॲक्सिलेटर दाबला. आता ती प्रतिमा अधिकाधिक जवळ आली.

दोन मिनिटात गाडी त्याला पार करून पुढे गेली.

पहाटे मी बेळगावला थांबलो. चहा पिता पिता वर्तमानपत्र वाचू लागलो.

' छापता छापता ' खाली ताज्या बातम्या होत्या. वाचता वाचता मी चमकलो. हातातला चहाचा कप खाली पडला. डोळे भणभणू लागले. ती अक्षरे नाचू लागली.

' धावत्या ट्रकखाली सापडून माणूस ठार. मृताच्या खिशातील कागदपत्रावरून त्याचे नाव अरविंद शर्मा असून ते उत्तर प्रदेशातील गोंदिया गावचे आहेत असे कळते. अपघात रात्री एकच्या सुमाराला झाला असावा असा निष्कर्ष पोस्टमार्टेम-नंतर डॉक्टरनी काढला. वहानाचा पत्ता नाही. श्री. अरविंद शर्मा यांच्या मोटारला किरकोळ अपघात झाल्याने मदतीसाठी ते रस्त्यात उभे असावेत असा अंदाज आहे. ते येथे कर्नल जाधवांच्याकडे उतरले होते. "

" रात्री आठला मी बेळगाव सोडले. अंधार दाट झाला आहे. वाटेत एखादा माणूस दिसेल. ट्रक जवळ जाताच तो नाहीसा होईल. किंवा एकदम मोठा मोठा होईल. ते अमानवी अजस्त्र स्वरूप पहाता पहाता मला धक्का बसेल. किंवा त्याच्या-मधून गाडी जाऊन, तो नाहीसा होईल किंवा त्याच्यावरून गाडी जाऊन, त्याचे प्रेत शिल्लक राहील. अरविंद शर्मासारखे !



डॉ. के. ना. वाटवे

पुस्तके

# सावरकर : एक सांगोपांग चिकित्सा

'सावरकर-एक चिकित्सक अभ्यास ' हा डॉ. प्र. ल. गावडे यांनी पुणे विद्यापीठाच्या पदवी परीक्षेसाठी सादर केलेला व विद्यापीठाकडून मान्य झालेला प्रबंध आहे. सावरकरांचे कर्तृत्व अनेकांगी असले तरी या प्रबंधात सावरकरांच्या वाङमयीन कर्तृत्वाचाच व वाङमयीन दृष्टीने विचार केला आहे. सावरकरांचे स्वतःचेच वाङमय अफाट आहे. आणि त्यावर टीका, विवेचने भाष्ये अशा स्वरूपाचे तितकेच अफाट लिखाण झाले आहे. डॉ. गावडे यांनी आठ दहा वर्षे अहोरात्र व्यासंग करून या दोन्ही प्रकारचे वाङमय संपूर्णपणे अभ्यासिले आहे. या वाङमयाच्या अफाटपणाची कल्पना प्रबंधाच्या शेवटी दिलेल्या संदर्भ ग्रंथाच्या परिशिष्टावरून येईल. गावडयांनी या सर्व वाङमयाचे इतके अवलोकन केले आहे की, ते आपल्या कोणत्याही विधानास मूळ आधार काढून दाखवितात. काही ठिकाणी तर वाक्या-वाक्याला आधार आहेत. त्यामुळे त्यांचे लिखाण सप्रमाण, साधार व म्हणून प्रत्ययकारी झाले आहे.

या दोन्ही प्रकारच्या वाङमयाचे विवेचन करताना गावडयांनी नुसती संकलनात्मक दृष्टी ठेवली नाही तर त्या संकलनाला एका मुख्य सूत्रात गोवले आहे. ते म्हणजे सावरकरांचे व्यक्तिमत्त्व. सावरकरांचे सर्व प्रकारचे वाङमय त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून स्फुरले आहे व तो त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार आहे. या मुख्य सूत्रावर सर्व प्रबंधाची उभारणी केली आहे.

प्रबंधाची रूपरेखा त्याच्या प्रकरणांच्या मथळयावरूनच वाचकांचे ध्यानी येईल. प्रकरण पहिले : सावरकरांचे वाङमयीन व्यक्तिचरित्र. दुसरे : सावरकरांचे व्यक्तिमत्त्व. तिसरे : चरित्रकार सावरकर. चौथे : इतिहासकार सावरकर. पाचवे : निबंधकार सावरकर. सहावे : कवी सावरकर. सातवे : नाटककार सावरकर. आठवे : कथा-कादंबरीकार सावरकर. नववे : भाषा शुद्धी व लिपिशुद्धी यांचे पुरस्कर्ते सावरकर. दहावे : समारोप.

सावरकरांचे व्यक्तिमत्त्व हे या प्रबंधातील विवेचनाचे मुख्य सूत्र असल्याने गावडे यांनी त्या व्यक्तिमत्त्वाबद्दल काय म्हटले आहे हे जाणण्याची वाचकास जिज्ञासा होईल. पहिल्या प्रकरणात सावरकरांच्या वाङमयीन प्रवृत्तीची घडण कशी झाली

हे त्यांच्या चरित्रावरून दिले आहे. व दुसऱ्यात सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचे विवेचन आहे. गावडे म्हणतात, ' सावरकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विचार केल्यावर जे दर्शन घडते ते बहुविती Multi dimensional स्वरुपाचे आहे. परस्पर-विरोधी व समन्वय न घडलेल्या अनेक प्रवृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वात होत्या. कवितेला अश्रूंनी न्हाऊ घालणारी उत्कट भावनात्मकता आणि श्रुतिस्मृतीपुराणोक्त विसंगत तत्त्वाशी झगडणारी तर्ककर्कशता त्यांच्या ठायी होत्या. आत्मौपम्य वृत्तीने ते सर्व सजीव सृष्टीशी समरस होत तर निज जाती छळाने त्यांचे हृदय तळमळे. हिंदुत्वाचीच खूण म्हणून ते कधी मानवतावादी बनव.तर कधी सूर्य विझला तर मानव्याचे काय होईल, यापेक्षा हिंदूंना प्रकाश मिळणार नाही. याचे दुःख त्यांना अधिक वाटे. अहंप्रभुता आणि विनम्र कृतज्ञभाव यांचे विलक्षण मिश्रण त्यांच्या ठिकाणी होते. व्यक्तिगत जीवनात अशुभदर्शी प्रतिकूलतेचाच अनुभव घेतलेले सावरकर सार्वजनिक जीवनात वावरताना मात्र दुर्दम्य आशावाद बाळगीत असत. जनतेला चेतविणाऱ्या हौतात्म्याचे आकर्षण सावरकरांना जितके होते तितकेच कोणचे हौतात्म्य अनुकरणीय व प्रशंसनीय याचेही तारतम्य बाळगून आत्महत्त्येपासून परावृत्त करणारी स्थिर विवेचक वृत्ती त्यांच्या ठायी होती.


' चिंतनशील, एकांतप्रिय असलेले सावरकर अखंड उद्योगी व प्रत्यक्ष चळवळ उभी करणारे संघटक होते. कुटुंबशील सावरकर अत्यंत प्रेमळ व हळवे वाटतात.' परंतु कर्तव्य भावनेने त्यांनी आपल्या मनाला अत्यंत कठोर बनविले होते. हिंदुत्व-निष्ठा ही त्यांच्या जीवनातील अंतिम व सर्वश्रेष्ठ निष्ठा होती आणि बुद्धिनिष्ठा, स्वातंत्र्यनिष्ठा व विज्ञाननिष्ठा या त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील इतर निष्ठा तिच्या अंकित झाल्या होत्या. हिंदूंच्या पुनरुत्थासाठी परमेश्वर अवतार घेईल असा बुद्धिनिष्ठा व विज्ञाननिष्ठा यांच्या कक्षेत सामावू न शकणारा विचार हिंदुत्वनिष्ठेने प्रभावित होऊन ते बोलत असत. तसेच स्वा. सावरकरांपेक्षा हिंदुसंघटक सावरकर असा आपला उदय होण्यातच त्यांना अभिमान वाटत होता. सावरकरांच्या व्यक्ति-मत्त्वाच्या या विविध अंगाना एकत्रित आणणारे हे ताण त्यांच्या हिंदुत्वनिष्ठेशी एकत्रित झाले होते.

यानंतर चरित्रकार सावरकर या प्रकरणात प्रबंधकारानी सावरकरांनी लिहिलेल्या चरित्रांचा विचार केला आहे व सुभाषिते, भाषाशैली इ. अनेक दृष्टीने त्याचा विचार करून सावरकरांचे सर्व चरित्रवाङमय त्यांच्या आवडीनिवडीतून निर्माण झाले आहे, असा निष्कर्ष काढला आहे. निबंधकार सावरकर व कवि सावरकर ही दोन प्रकरणे या प्रबंधाच्या केंद्रबिंदूस्थानी आहेत. निबंधकार सावरकर या प्रकरणात सावरकरांचे सामाजिक, धार्मिक इ. इरक्षेत्रातील विचार एकत्रित झाले आहेत. गावड्यांच्या विवेचनाचा विशेष असा आहे की, असे करताना ते मुळातील अवतरणे घेतात. त्यामुळे सावरकरांच्या वाङमयात आपण अवगाहन करीत आहोत अशी

वाचकाला प्रचीति येते. गावडे याचा हा प्रबंध वाचला की सावरकरांचे सर्व काही वाचल्याचा प्रत्यय येईल इतके ते सर्व समावेशक आहे. कवी सावरकर या प्रकरणात सावरकर जसे भावकवी होते, तसे त्यांच्या ठायी महाकवित्वाची लक्षणे होती असे टीकाकरांच्या मतानुसार दाखविले आहे. काव्य वाङ्मय हे त्यातल्या त्यात व्यक्तिमत्त्वातून स्फुरलेले असते. त्यामुळे हे प्रकरण अत्यंत प्रत्ययकारी झाले आहे.

गावडे यांना सावरकरांबद्दल नितांत आदर वाटत असला तरी त्यांचा आदर किंवा भक्ती ही अंध नाही. त्यांनी जरूर त्या ठिकाणी सावरकरांच्या वाङ्मयावर कडक टीकाही केली आहे. ही गोष्ट नाटककार सावरकर, कथा-कादंबरीकार सावरकर आणि भाषाशुद्धी, लिपीशुद्धी पुरस्कर्ते सावरकर या तीन प्रकरणांवरून येते. सावरकरांनी आपल्या नाटक, कथाकादंबऱ्यातून प्रचारावर अधिक कटाक्ष ठेवला आहे. कलेकडे त्यांचे लक्ष नाही हे सांगताना गावडे म्हणतात, 'सावरकर प्रचारक होते. कलावंत नव्हते. ते आपलीच मते व आपली भाषा पात्रांच्या तोंडी घालीत. याचे कारण बोधवाद हा सावरकरांपुढे होता. कलावाद नव्हता. याप्रमाणे त्यांच्या लिपि आणि भाषाशुद्धीतील वैगुण्याची नोंद करण्यात आली आहे. एकंदरीने विचार करता गावड्यांनी केलेला सावरकरांचा हा अभ्यास त्यांनी म्हटल्याप्रमाणे अत्यंत चिकित्सक, सांगोपांग आहे. वाचकास असे वाटते की, गावड्यांचे हे एक पुस्तक वाचले की सावरकरांचे हृदगत् समजण्यास अडचण पडणार नाही. सावरकरांची कीर्ति त्यांच्यामागे महाराष्ट्रात दुमदुमत ठेवत ठेवण्याला जी काही थोडी बोटावर मोजण्यासारखी पुस्तके मराठीत झाली आहेत त्यात गावड्यांचा हा ग्रंथ अग्रगण्य आहे. एक संशोधनात्मक प्रबंध म्हणूनही त्याचे मूल्य फार मोठे आहे. असा अप्रतीम प्रबंध लिहिल्याबद्दल डॉ. प्र. ल. गावडे यांचे अभिनंदन करावे तितके थोडे आहे. □

**सावरकर : एक चिकित्सक अभ्यास : डॉ. प्र. ल. गावडे**
प्रकाशक : स्वाध्याय महाविद्यालय पुणे. मूल्य रु. २५. पृष्ठे ६११.



मावळत चाललेला व्यायाम प्रकार

# मल्लखांब

अखिल भारतीय पातळीवरील जिम्नॅस्टिकच्या स्पर्धा दिल्ली येथे पार पडल्या. या स्पर्धेत मल्लखांब या अस्सल भारतीय खेळाचा समावेश होता.

महाराष्ट्राचा प्रदीप चेंबूरकर या स्पर्धेत कुमारांच्या गटात पहिला आला. मोठ्या गटाचे सांघिक अजिंक्यपद गुजरातने जिंकले. उपविजेतेपद महाराष्ट्राला मिळाले. खुंटावरच्या खेळात मग तो खोखोचा असो वा मल्लखांबाचा, गुजरातकर प्रविण आहेत हे खरे.

महाराष्ट्राच्या खेडोपाडी रुजलेला मल्लखांब हा खेळ. लाल मातीच्या आखाड्या शेजारी दृष्टीला पडतोच. त्यामानाने शहरातील आधुनिक व्यामामशाळेत हा व्यायाम प्रकार क्वचितच दिसतो. कुस्ती असो वा कबड्डी खोखो असो कुठल्याही खेळासाठी मल्लखांबावरची कसरत पायाभरणी म्हणून खूप फलदायी ठरते. शरीर पीळदार, काटक, प्रमाणबद्ध आणि भरपूर दमाचे तयार होते. मल्लखांबावरचा सराव हे कष्टाचे काम आहे हे मात्र खरे.

बहुधा यामुळेच हा अल्पमोली बहुगुणी कसरतीचा व्यायाम प्रकार आता लोप पावत चालला आहे.

काही महिन्यांपूर्वी सांगलीला राज्यक्रीडा महोत्सव झाला. ग्रामीण भागातल्या खेळाडूंना उत्तेजन देण्यासाठी भरविण्यात आलेला हा महोत्सव. खेडेगावातच अजून काही प्रमाणात मल्लखांब शिल्लक आहे ही माझी कल्पना. स्पर्धेचे प्रमुख पंच आणि मिरजेचे ख्यातनाम मल्लखांबपटु देवल मला त्याबाबत म्हणाले, ' अहो, आलेल्या बत्तीस स्पर्धकांपैकी अवघे बारा खेळाडू दुसऱ्या फेरीसाठी आले. इतकी यांची तयारी आणि इतकी यांना हौस ! मल्लखांबावरची एक फेरी असते तीन मिनिटांची. अशा तीन फेऱ्या तीन दिवसात घेण्यात येतात. मल्लखांबात एकूण पकडा सुमारे दीडशे. तीन मिनिटात त्यापैकी उत्तम अशा वीस पकडा जास्तीतजास्त होतात, पण स्पर्धेत उतरणारे हे खेळाडू तीन पाळ्यामध्येही येवढ्या वीस पकडा करून दाखवू

शकत नाहीत. मग पुन्हा पुन्हा त्याच पकडा करणे वा वेळकाढूपणा करणे असले उद्योग करतात. त्याला काय मार्क द्यायचे ? यांचे शिक्षणही कच्चे दिसते. मल्लखांबाजवळ कोणता पाय पुढे घेऊन उभे रहावे हे यांना माहीत असेल तर नशीब !

सफाई, पवित्रा, धोक्याची पकड आणि सातत्य याच्यावर आम्ही मार्क देतो. सरावाच्या अभावी सफाई नाही, शिक्षणाच्या अभावी पवित्रा पक्का नाही. सातत्य टिकावे असा कस कमविण्याचा प्रयत्न नाही आणि मग धोक्याच्या पकडा करण्याचे धाडस तरी कोठून दाखवणार ? बिनहाती घोडा, मयूरासन, तोलासने ड्रॉव या पकडी आजकाल कुठे बघावयासच मिळत नाहीत. श्री. देवल हे आंतरविद्यापीठ आणि अखिलभारतीय सामन्यामध्ये पंचाचे काम केलेले ख्यातनाम मल्लखांबपटू आहेत.

मल्लखांबावरची अनेक कौशल्ये ही उत्तम कसरतीचा मनमुराद आनंद देऊ शकतात. वेतावरच्या मल्लखांबावरची पद्मासनासारखी विविध कौशल्ये, बाटल्यावर चौरंग ठेवून त्यावर मल्लखांब ठेवून केलेला नजर खिळवणारा मल्लखांब, दंडाना धारदार पाती वा मशाली बांधून केलेला मल्लखांब अशी अनेक कौशल्ये मी बघीतली आहेत. आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर त्याचे मनापासून कौतुक झाले असा हा एक मराठमोळा व्यायाम प्रकार आहे. अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने जर्मनी, इटली, जपान यासारख्या देशात याची प्रात्यक्षिके दाखवून वाहवा मिळवली आहे. एका साध्या खांबावर इतक्या विविध प्रकारे कसरत करता येते याचे मोठे आश्चर्य आणि कौतुक परदेशी व्यायाम तज्ज्ञांनी व्यक्त केले होते. मल्लखांबातील कसाचा मॅटवरील कुस्तीसाठी तर अतिशय उपयोग होतो.

पाश्चात्य व्यायामाचा झपाट्याने प्रसार होत असताना त्यांच्या चांगल्याबरोबरच आपल्यातले उत्तमही टिकवण्या रुजविण्यासाठी, वाढविण्यासाठी, आपल्या व्यायामसंस्थानी प्रयत्न करायला नको का ? ◻

## शुभेच्छा–हुरहुरणाऱ्या मनाने

मारुती मानेचे शुभमंगल झाले. कुस्ती खेळताना सहजासहजी कुणाच्या हातात हात सापडून पकड न होऊ देणाऱ्या मारुतीचा हात आता आयुष्याच्या साथीसाठी बळकटपणे पकडला गेला. या कुरघोडीत आनंद आहे म्हणूनच अभिनंदन !

मारुतीच्या सर्वच चहात्यांना आता हुरहुर लागली आहे. अलीकडच्या काळातील सर्वात गाजलेला आणि लोकप्रिय कुस्तीगीर म्हणजे मारुती माने. आयुष्यात त्याला सोबत लाभली आहे, त्याबरोबर मात्र त्याच्या कुस्तीची सोबत आता आम्हा शौकी-

## शहाळं खाण्याची ही एक पद्धत

## पण ही त्यापेक्षांही चांगली



भारतातील सर्वोत्कृष्ट नारळांच्या कुरकुरीत स्वादिष्टपणाची मधुर चव तुम्हांला ब्रिटानिया नाईस बिस्किटांत आढळेल. ती उत्तम स्वादाची नि कुरकुरीत असून त्यांवर उत्तम प्रकारची शुभ्र साखर पसरलेली असते. ब्रिटानिया नाईस. वैशिष्ट्यपूर्ण स्वादाची वैशिष्ट्यपूर्ण बिस्किटे.




# ब्रिटानिया नाईस बिस्किटे

भारतातील सर्वोत्कृष्ट बिस्किटे ब्रिटानि

नांना सोडावी लागणार. त्यानंतर महाराष्ट्रातले सर्वच कुस्तीगीर आपल्या क्षेत्रातून निवृत्त झाले. साताऱ्याचे श्रीरंग जाधव, सांगलीचा विष्णु सावर्डे, कर्नाटकाचा पण नंतर सांगली सोलापूरकडे आलेला बसलिंग करजगे ही याची ठळक उदाहरणे. हे लोक व्यायाम करतात, क्वचित प्रसंगी लढतीलाही उतरतात, पण आव्हानाची भाषा संपून गेलेली असते.

मारुतीचे मैदानावरचे अस्तित्व हा एक चैतन्यकारक अनुभव असे. पावणेसहा फूट उंचीचा दुहेरी हाडपेराचा गोरवर्णी असा हा भीम मैदानावर आव्हानाच्या पवित्र्यात उभा असलेला पहायला मिळाला म्हणजेच पैसे वसूल होत. मारुतीच्या सर्वच कुस्त्या मानाच्या आणि अटीतटीच्या असत. बसलिंग करजगेकडून झालेल्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी प्रथम तो त्याच्याशी लढला. आधी महंमद हनीफला हरवले तर तुझ्याशी खेळतो या सावर्डेच्या उद्‌गाराने दुखावलेल्या मारुतीने बेजोड करून दमात उखडून हनिफ महंमदला हरवले. त्याच जिद्दीने पावणेतीन तास लढत देऊन विष्णु सावर्डेला अस्मान दाखविले. हिंदकेसरी हजरत पटेलला चितपट मारले आणि त्याच वर्षात चंदगीरामला चीत करणाऱ्या सादिक पंजाबीला पाणी पाजले.

पंजाबचे नावाजलेले म्हणून आलेल्या लढत बहादूराना आणि सैन्यातले मानमरातब धारण करणाऱ्या कुस्तीगीरांना तर त्यांनी लीलया हरविले आहे. लालमातीतील एकाद्या कुस्तीत गेल्या आठ वर्षात त्यानी अपयश घेतले नाही. चंदगीरामबरोबर बेळगावला झालेली आणि तीन तासाने बरोबरीने सुटलेली एकमेव लढत सोडली तर बाकीच्या सर्व कुस्त्या त्यांनी निकाली केल्या आहेत:

अशा तुल्यबल, चमकदार आणि आव्हानाच्या लढती, त्याही निकाली बघायला मिळणे हे आज दुर्मिळ होत चाललय. मारुतीची निवृत्ति त्यामुळे अधिकच जाणवणार. आणखीही कारणे आहेत. दोन गोष्टी बघण्यासाठी आमचे डोळे आता कायमचे आसुसलेलेच रहाणार. एक म्हणजे गणपत आंदळकर आणि सादिक पंजाबीची सहजगत्या पराभूत करणाऱ्या पाकिस्तानच्या सर्वश्रेष्ठ मल्ल गोगाची या हिंदकेसरी बरोबरची लढत आणि दुसरे म्हणजे ऑलिंपिकमधून सुवर्णपदक गळ्यात घालून मिरवत येणारा मारुती.

असो. त्याच्या वैवाहिक जीवनाला ' क्रीडांगण 'च्या मनःपूर्वक शुभेच्छा.

— प्रतिनिधी

सौ. पुष्पा भावे



# पुन्हा एकदा जस्मा ओडन

श्री. कमलाकर सोनटक्के यांनी दोन वर्षापूर्वी 'जस्मा ओडन' या भवई पद्धतीच्या लोकनाट्याने मुंबईकरांचे लक्ष वेधून घेतले होते. मध्यंतरी श्री. सोनटक्के यांचे गुरु श्री. अल्काझी यांनी सादर केलेल्या 'जस्मा ओडन'चा प्रयोग पहतानाही मुंबईकर रसिकांनी सोनटक्क्यांच्या 'जस्मा'चीच आठवण कृतज्ञतेने काढली होती.

'नाट्यवेध' या संस्थेतर्फे पुन्हा एकदा श्री. सोनटक्के यांनी जस्माचा प्रयोग गेल्या आठवड्यात केला. गुजराती भवईचे हिंदीकरण करून परंतु पोशाख-वातावरण काठेवाडी राखूनच त्यांनी हा प्रयोग सादर केला. पूर्वीच्या जस्मा ओडनमध्ये मूळ भूमिका कु. मीना सुखटणकर यांनी केली होती, तर या प्रयोगात कु. वर्मा या नटीने ती केली. इतर नटवर्गामध्ये 'अमृत नाट्यभारती'च्या विद्यार्थ्यांचेच चेहरे दिसत होते. स्वत: श्री. सोनटक्के यांनी इंद्र आणि पाटणचा राजा जयसिंह, या दोन भूमिका केल्या.

लोकनाट्याची परंपरा मराठी रंगमंचाला असली तरी नृत्यनाट्य हा प्रकार मराठी रंगमंचावर कधी रुजलेला नाही. प्रस्तुत भवईमध्ये लोकनाट्य व नृत्यनाट्य या दोन्हींचे अंश आपल्याला आढळतात. श्री. सोनटक्के यांनी मागे सादर केलेल्या प्रयोगात या दोन्ही अंगाचे एकवट दर्शन कौशल्याने घडवले होते; परंतु नव्या प्रयोगात मात्र लोकनाट्याची बाजू जरा अनावश्यक लांबली व नृत्यनाट्याची शिस्त अपुरी पडली असे वाटले.

जस्मा ओडन हा प्रयोग पूर्वी, मला वाटते, दोन तासांचा होता, तो नव्याने सादर करताना लांबवण्यात आला आहे. नाट्यसदृश करमणूक तीन तासांची तरी असावी या संकेताला श्री. सोनटक्के बळी पडले असावेत. परंतु ज्या पद्धतीने हे नाट्य लांबवले गेले त्यामुळे त्यातील मूळचा गावरानपणा कमी झाला, ताजेपणा हरवला. व्ही. शांताराम पद्धतीच्या चित्रपटाप्रमाणे घातलेले मयूरनृत्य या नाट्यात विशोभित वाटले. विशेषत: जस्मा आणि तिचा कुरूप पती यांची योगायोगाने -नाआधी झालेली भेट मागील प्रयोगात जो परिणाम करू शकली होती तो या प्रयोगात काही अंशी मयूरनृत्याने नाहीसा झाला. श्री. सोनटक्के यांनी अशा कलाबाह्य मूल्यांच्या आहारी जावे हे बरे वाटले नाही.

श्री. सोनटक्के यांनी पाटणच्या राजाचा या नाट्यातील खलनायकाचा अभिनय, त्यातील मध्ययुगीन कुटिलपणा, नृत्यनाट्यातील लयीची जाणीव यासह फार नेमके-



जस्मा

वंदना ;

सिद्धराज :

कमलाकर सोनटक्के

पणाने केला. किंबहुना त्यांनी आपल्या हालचालीत ताल जसा मुरवला होता तसा इतर नटवर्गास मुरवता आला नाही.

या नृत्यनाट्यातील सूत्रधारासारखे असणारे पात्र एका नव्या नटाने जबाबदारीने सादर केले. जस्माचे आईवडील, दरबारी कवी व स्वतः सोनटक्के यांचा अपवाद वजा करता इतर नटवर्गास संवाद वा गाणी प्रेक्षकांपर्यंत पोचवणे जमले नाही.

अशा प्रकारचा नाट्यप्रयोग बसविताना समूह योजनेला फार महत्व असते. प्रस्तुत प्रयोगात श्री. सोनटक्क्यांनी नटसंचात निर्माण केलेल्या परस्पर समजाच्या सूत्राचे सुखद दर्शन घडले. त्यातील काही नृत्ये एका विलक्षण धुंदीत त्यांनी सादर केली, पण काही नृत्यात पदन्यासात एकताल जमत नव्हता.

श्री. सोनटक्क्यांच्या पूर्वीच्या प्रयोगातील विनोद आणि कारुण्य यांच्या सहज आविष्काराचा अनुभव ज्यांनी घेतला नव्हता त्यांना या गोष्टी कदाचित् खटकल्याही नसतील. अशा प्रकारचो लवचिक नाट्यमाध्यमे मराठी रंगमंचावर सादर होणे आवश्यक आहे. त्याविषयी काही आक्षेप घेताना अशा प्रयोगांच्या दिग्दर्शनातील अडचणींची जाणीव मला आहे. किंबहुना श्री. सोनटक्क्यांच्याच पूर्वीच्या प्रयोगांची मूल्ये वापरून नव्या प्रयोगाचे समीक्षण करावे लागत आहे हे त्यांना लाभलेले मोठे श्रेय नव्हे काय ?

□ □ □

निनाद कला केंद्र

## नावीन्यपूर्ण उपक्रम

# हिंदी गीतरामायण

### मराठीची गडद छाया

गीतरामायण – अण्णा माडगुळकरांच्या अर्थवाही लेखणीतून उतरलेली आणि सुधीर फडके यांच्या आकर्षक चाली आणि गोड गळयामध्ये न्हाऊन निघालेली प्रासादीक काव्यगाथा. कितीही वेळा ऐका, कंटाळा म्हणून येणार नाही, अशी विलक्षण मोहिनी या काव्याने मराठी मनावर घातली आहे. असं हे रामायण चक्क हिन्दीमध्ये ऐकण्याचा योग नुकताच आला.

नागेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करणाऱ्या निनाद कला केंद्र या मुंबईच्या संस्थेने हा कार्यक्रम सादर केला. परिश्रमपूर्वक बसवलेला हा कार्यक्रम आपल्याला आवडला हे प्रथम सांगितले पाहिजे. अर्थात पुण्यामध्ये आपल्याला हा कार्यक्रम आवडण्याचे आणि या उपक्रमाचे देशाच्या हिन्दी भाषीक भागातील यशाचे गणीत जमेलच असे सांगता येणार नाही.

निनाद कला केंद्र या संस्थेचा हा पहिलाच कार्यक्रम. मराठीमध्ये विलक्षण लोकप्रिय झालेल्या या कार्यक्रमाचा आनंद देशाच्या इतर भागातील रसिकांना मिळावा असे वाटल्याने श्री. नागेश जोशी यांनी प्रयत्न सुरू केले. गीतरामायण हिंदीमध्ये सादर करावे ही कल्पना निश्चित झाल्यावर त्यांनी पंडित रुद्रदत्त मिश्रा यांची गाठ घेऊन भाषांतराचे काम करण्याची विनंती केली. त्यातही गंमत अशी

की पंडितजींना मराठी मुळीच येत नाही. आणि नागेश जोशी यांचे हिंदी अस्सल मराठी थाटाचे. तरी नागेश जोशी यांनी प्रत्येक गीताचा अर्थ मिश्रांजींना समजावून सांगावा, आणि मूळ आशयाला आणि चालीला धक्का लागणार नाही अशा पद्धतीने मिश्राजींनी हिंदी अनुवाद करावा. असा उपक्रम सुरू झाला. हे नाही जुळले, तर शब्द मोडून दुसरे शब्द घालावेत. – तेही नाही जमले तर तिसरी रचना करावी.-असे करत करत अनुवादाचे काम सुरू झाले. मूळ भाषा अजिबात न समजता मिश्राजींनी अनुवादाची जी कामगिरी बजावली आहे ती खचित कौतुकास्पद आहे. वानगी दाखल दोन-तीन नमुने देतो.

रघुरायाच्या नगरी जाऊन
गा बाळांनो श्रीरामायण !

बच्चो, राघव नगरी जाना
रामायण के गीत सुनाना.

वेचिता फुले मी सहज पाहिला जाता !
मज आणून द्या तो हरीण आयोध्या नाथा !

तोडते सुमन जो सहज दृष्टिमे आया
ला दोना मृग जो अयोध्येश मन भाया !

मज सांग लक्ष्मणा जाऊ कुठे !
पती चरण पुन्हा मी पाहू कुठे !

बोलो लक्ष्मण मैं जाऊ कहाँ !
पता चरण पुनः लख पाऊ कहाँ !

काही गीतांची ही तोंडे फक्त वर दिली आहेत. परंतु संपूर्ण गीतें ही अशाच सोप्या अर्थवाही रचनेत हिंदीमध्ये अनुवादित करण्यात आली आहेत. अर्थवाही सुलभ रचना हे जे माडगुळकरांचे वैशिष्टय ते मिश्राजींनी हिंदीमध्ये कायम ठेवले आहे. त्याबद्दल त्यांना धन्यवाद दिले पाहिजेत.

हिंदी अनुवादाचे हे काम जवळ जवळ वर्षभर चालले होते. सर्व गीते अनुवादीत झाल्यावर गाण्यांच्या तालमी सुरू झाल्या. मूळ चाली कायम असल्याने चालींचा प्रश्न नव्हता. गीते सादर कशी होतात याला महत्व होते. गीतकाराचा प्रत्येक शब्द श्रोत्यांपर्यंत अचूक पोचवण्याची जी कामगिरी सुधीर फडके करतात, तीच कामगिरी हिंदी गीतरामायणामध्ये वसंत आजगावकर व कालिन्दी कोल्हटकर ही जोडी करते. संपूर्ण गीत श्रोत्यांपर्यंत व्यवस्थित पोचत असल्याने श्रोत्यांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळतो.


वसंत आजगावकर, व कालिंदी कोल्हटकर या दोघांचाही आवाज सुरेल, गाण्याची धाटणी या कार्यक्रमाला साजेशी, आणि अन्य साथीदारांची व वाद्यवृंदांची उत्कृष्ठ पूरक साथ यामुळे कार्यक्रमाची रंगत वाढते. हिंदी गीतरामायणाचे यश हा कार्यक्रम हिंदी प्रदेशात कितपत यशस्वी होईल यावर अवलंबून आहे. आत्तापर्यंत दिल्ली, हृषीकेश, आणि उत्तर हिंदुस्थानातील अन्य अनेक ठिकाणी हिंदी गीतरामायणाचे कार्यक्रम झाले आहेत. या कार्यक्रमांचे स्वागतही बऱ्यापैकी झाले आहे. सुमारे ३० कार्यक्रम झाल्यावर या उपक्रमाला जी गती प्राप्त होणे आवश्यक आहे अशी गती अद्यापि प्राप्त झालेली नाही.

या संपूर्ण कार्यक्रमावर मराठी गीतरामायणाची घट्ट पकड आहे. कार्यक्रम ऐकत असताना माझ्याशेजारी बसलेल्या श्री. गजाननराव वाटवे यांची प्रतिक्रिया मी विचारली असता ते म्हणाले, कार्यक्रम ठीक आहे. परंतु हिंदी रचना मराठी चालीमध्ये बरोबर वाटत नाही. मला स्वतःलाही हिंदी गीतरामायणामध्ये आपण काही वेगळे ऐकतो आहोत, असे भासले नाही. मराठी कार्यक्रमाशी असलेली ही जवळीक कदाचित त्रासदायक ठरेल. म. म. द. वा. पोतदार यांची प्रतिक्रियाही आपण जणू काही मराठी गीतरामायण ऐकतो आहो अशीच होती. आता या उपक्रमावरील या प्रतिक्रिया उपकारक की मारक यावर आत्ताच भाष्य करणे कठीण. परंतु मराठी मुलखामध्ये मराठी गीतरामायणाला जे स्थान आहे, ते स्थान हिंदी उपक्रमाला मिळेल की नाही, त्यावर या कार्यक्रमाचे यश अवलंबून आहे. निनाद कला केंद्राच्या कलावंताखेरीज हिंदी मुलखातील हिंदी भाषिक गायकांना हा कार्यक्रम उचलावासा वाटेल त्या वेळी या उपक्रमाला खरी गती लाभेल. निनाद कला केंद्राचे नागेश जोशी यांनी दिर्घकाळ परिश्रम घेऊन हा जो नावीन्यपूर्ण उपक्रम हाती घेतला त्याचे मात्र अवश्य स्वागत केले पाहिजे.


**— शरद गोखले**



# यान अज्ञाताच्या



# सीमेवर



मंत्र-तंत्र, भूतपिशाच्च
जादूटोणा, हातचलाखी
कालीमाता, यल्लम्मा
............
अनेकांच्या मनात
आणि अनुभवात
येणाऱ्या या प्रश्नांची
गूढता उकलण्याचा एक प्रयत्न...

# ज्ञात - अज्ञाताच्या सीमारेषेवर

## संयोजक : डॉ. नरेन्द्र दाभोळकर


जादुटोणा, भुतेखेते, मांत्रिक या साऱ्यांबद्दल आपल्या देशाची प्रसिद्धी जगात फार पुरातन काळापासून आहे. मुंडके नसलेल्या माणसाची आकृति पावलाचा आवाजही न करता उंच उंच होत जाणे आणि अचानक अदृश्य होणे, एखाद्या बाईच्या अंगात कालीमाता वा यल्लाम्मा संचारणे किंवा पाणवठ्यावरून परतताना एखाद्या समंधाने झपाटून परतणे या साऱ्या घटना आपण अनेक वेळा ऐकलेल्या अथवा प्रत्यक्ष पाहिलेल्या असतात. मंत्राच्या सहाय्याने सापाचे विष उतरविणे, भानामतीमुळे घरातील वस्तू वाटेलतशा फेकल्या जाणे आणि लिंबात बंदीस्त करून पिशाच्याला फेकून देणे हे आपल्याला पटू शकते. हातामधून अंगारा, फुले, कुंकू, तांदूळ, बघता बघता निर्माण करणारे ' सिद्ध ' पुरुष आपल्या समाजात अनेक आहेत. मरणोत्तर अस्तित्व आणि पुनर्जन्म हा एक जोरदार वादाचा विषय होऊन बसला आहे. ज्ञान विज्ञानाचे सारे नियम उल्लंघन करून त्या पलीकडच्या वेगाने होणारा मनाचा प्रवास टेलिपथीच्या-

रूपाने काहीजण दाखवू शकतात. शेकडो मैलावरच्या गोष्टी दिव्य दृष्टीने पाहणारी व्यक्ती आपल्या मुलीला भेटल्याची कबुली कम्युनिस्ट पक्षाचे अध्यक्ष श्री. डांगे देतात. कधीही अमेरिका न पाहिलेला हॉलंडचा...क्रॉइस्ट अमेरिकेत हरवलेल्या मुलीची माहिती आणि तिचा न्यूयार्कमधला नेमका ठावठिकाणा केवळ फोटोवरून सांगू शकतो.

या साऱ्या घटनांमागे नेमके असते तरी काय? देवी खरोखर अंगात येते की तो मानसिक आजार असतो. आपोआप जागेवरून हलणाऱ्या वस्तुही भुताटकी असते की बनवाबनवी? हातामधून निर्माण होणाऱ्या गोष्टी ही अध्यात्मिक वा योगसामर्थ्याने साध्य होणारी किमया आहे की सामान्य दर्जाची हातचलाखी? पंचेंद्रियांच्या पलीकडे होणारे ज्ञान ही कोणती अद्भुत मानसिक शक्ती आहे? कुंडलीनी जागृत करून ती प्राप्त होते, की दैवी देणगी म्हणून लाभते?

या साऱ्या प्रश्नांना अनेक बाजू आहेत. पहिली बाजू जे मांत्रिक आणि महाराज या साऱ्यांच्यावर संपूर्ण विश्वास ठेवतात त्यांची? कृपासागर देव आणि बाबर यांच्या मुलाखतीत ही बाजू तुमच्यापुढे येईल. असेही काही साधक आहेत की जे या साऱ्या गोष्टी मानतात. मात्र त्यांचा प्रयत्न असतो या सर्वाला विज्ञानाचे अधिष्ठान संपूर्णपणे देण्याचा. स्वामी विज्ञानानंद, पूज्य दत्ता बाळ आणि पदार्थ विज्ञानाचे ख्यातनाम प्राध्यापक रामभाऊ जोशी हे या बाजूचे समर्थक आहेत. या प्रश्नाला महत्वाची मानसशास्त्रीय बाजूही आहे. येरवडा मेंटल हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. देव आणि मिरजेच्या कृपामाई नर्सिंग होमचे प्रमुख डॉ. देवसिकदार या दोन प्रख्यात मानसोपचार तज्ञांनी ही बाजू विशद केली आहे. जादूगार रघुवीर हे सारे जग पायाखाली घातलेले महाराष्ट्राचे लाडके जादूगार. आपल्या शास्त्राच्या आणि अनुभवाच्या सहाय्याने या साऱ्या प्रकारामागची बनवाबनवी वेशीवर टांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य – देवदत्त दाभोळकर यांनी केले आहे, या प्रकाराबाबत विचारवंतांचे वस्तुनिष्ठ परखड विवेचन. या बाबतीत देशात व परदेशात मान्यवर संस्थांकडून या प्रकाराची झालेली चौकशी शास्त्रीय पाहणी व त्यांचे निष्कर्षही वाचकांच्या पुढे ठेवले आहेत.

असंख्य वाचकांच्या मनात व अनुभवात येणाऱ्या या प्रश्नांचा सर्व बाजूंनी मागोवा घेण्याचा हा एक प्रयत्न आहे......




# या गोष्टी मी मानतो.

## लोखंडी पकडीने न निघालेली दातखीळ केवळ अंगाऱ्याने निघू शकते.

**श्री. बाबर :** एखाद्या व्यक्तीला भूत लागले असेल का ? कोणत्या प्रकारचे हे ओळखण्याचे अनेक मार्ग आहेत. पत्रिकेमध्ये सहाव्या स्थानात जर बुध अथवा रवी असेल तर ती व्यक्ती झपाटली जाण्याचा संभव अधिक. स्वप्नामध्ये कोणीतरी येऊन भीति दाखविणे, अंगावर बसणे, पाय ओढणे वा बाहेर चल म्हणणे हे सारे पिशाच्च योनीचे खेळ असतात. गणिताच्या सहाय्यानेही कोणत्याप्रकाराची बाधा झाली असेल हे कळू शकते. तिथी, वार, राशी, नक्षत्र, यांच्या सहाय्याने ही गणिते केली जातात.

डाव्या हाताची करंगळी पकडून वा केसाची बट धरून वायुरूपाने वावरणारे हे पिशाच्च मांत्रिक पकडून ठेवू शकतो. पिशाच्चाला वठणीवर आणणे व हाकलून देणे या गोष्टी मांत्रिकाच्या सामर्थ्यावरच अवलंबून असतात. सामर्थ्य कमी पडले तर त्याला त्याचा त्रास झाल्याशिवाय रहात नाही. दैवी सामर्थ्य, तीर्थ, अंगारे, प्रसंगी धाक व मार. या माराच्या सहाय्याने पिशाच्चाला बोलते करावे लागते. पिशाच्चाला नेमके पकडून ठेवणे आणि मार देणे ही कला आहे. कारण छडी उचलल्यावर ते झपाटलेल्या माणसाच्या सावलीचा आश्रय चटकन घेते आणि मार बिचाऱ्या माणसालाच बसतो. लोखंडी पकडीने न निघणारी दातखिळ अंगाऱ्याने निघाल्याची अनेक उदाहरणे दाखविता येतील. मांत्रिकाच्या देवतेचा हा अंगारा झपाटलेल्या व्यक्तिच्या देवघरात ठेवून धुपवला तर तो अधिक परिणामकारक ठरतो.

या साऱ्यानंतर पिशाच्च मागणे मागते. बऱ्याच वेळेला हे झाड (म्हणजे झपाटलेला माणूस) मी घेऊन जाणार असेही ते म्हणते. काही वेळेला हे मागणे पिवळा




कृ. भा. बाबर

भात, चपाती, अंडे, कोंबडी, बकरा, असे असते. अर्थात त्याला काय द्यावयाचे हे मांत्रिकच्या इच्छेवर व सामर्थ्यावर अवलंबून आहे. बहुधा यात धान्याची भाकरी, दही-भात तिखट, कांदा असल्या गोष्टींवर काम भागते. जीव असलेली एखादी गोष्ट दिल्यास चांगले. म्हणून अंडे वा कोंबडी दिली जाते. हे सारे त्या व्यक्तीवरून उतरवून काढून तो ज्या दिशेकडून येताना झपाटला त्या दिशेकडे वा पिशाच्चांचे प्राबल्य दक्षिणेला असे म्हणून तिकडे ठेवले जाते.

काहीवेळेला मांत्रिक कमी पडतो. माझ्याबाबतीत अशा लोकांना मी पौर्णिमेला पलुसला घेऊन जातो. तेथील माझ्या देवाची शक्ती माझ्या बाबतीत अवघड ठरलेल्या गोष्टी सहजपणे घडवून आणते. काही वेळा या ठिकाणीही अनेक वेळा घेऊन जावे लागते पण गुण हमखास येतो.

पिशाच्च बांधून ठेवल्यास तीनधारी लिंबाचा फार उपयोग होतो. आपल्या देवतांच्या सहाय्याने लिंबात पीडा भरता येते. मात्र अशी लिंबे ताबडतोब त्या व्यक्तीवरून उतरवून फेकून द्यावी लागतात. चुकून ती घरात काही कारणाने राहिल्यास त्याच्या घरच्यांना अनेक प्रकारे अपाय होऊ शकतो. माझ्या स्वतःच्या घराबाबत ही गोष्ट मी अनुभविली आहे. दैवी सामर्थ मिळविण्याचे अनेक मार्ग असतात. स्मशानात जाणे, नदीत बसणे वा इतर अनेक. मी स्वतः संसारी आणि नोकरदार माणूस. देवतेची नियमित उपासना, शुचिर्भूत राहणे, गोमुत्र पिणे, मासिक पाळीचे वेळी स्त्रियांच्या हातचे न खाणे वगैरे नियम मी पाळतो. काम केलेल्या व्यक्तीकडून स्वतः मागून पैसे घेणे निषिद्ध. स्वखुशीने देतील ते निराळे. अंगात येणे, भानामती, मूठ मारणे, हे असेच देवतांच्या व अतृप्त आत्म्यांच्या सहाय्याने होणारे खेळ आहेत. ■



# पिशाच्च दोन प्रकारची. एक सोडलेली. दुसरी लागलेली.

दहा बाय दहाची खोली. कोपऱ्यात दोन मोठे कोनाडे, त्याचेपुढे फूटभर उंचीचा चौरंग. चौरंगाच्याखाली फुलाचे चक्र, पुढील बाजूस स्वस्तिक, मागील कोनाड्यात गणपती, दत्त आणि कुलदैवत यांच्या ठळक तस्बीरी. इतरही छोटीमोठी चित्रे, त्याचेपुढे उदबत्या, धूप, बाजूला भक्तगणांनी दिलेला प्रसाद, चौरंगावर बुटकी, वयस्क व सडपातळ व्यक्ति. समोरच्या पाटावर वीस एक वर्षाची तरुणी, तिची बट पकडून चाललेला प्रश्नांचा भडीमार. ' बोल कोण तू ? कोठून आलास ? का आलास ? ' वेताची काठी हातात घेऊन दाखविलेला धाक. मग, त्या भूतयोनीचे निवेदन पुन्हा न येण्याचे आश्वासन...मग थापटणे, थोपटणे, अंगारा, लिंबू, तीर्थ देताना वाकून केलेला नमस्कार.

कृपासागर देवांच्या सुमारे दीड तासाच्या मुलाखतीत मी अशा तीनचार केसेस बघितल्या. वयाच्या आठव्या वर्षी नानांनी अजिक्यतारा डोंगरावरच्या वेताळाच्या टेकडीवर एक साधा बैरागी प्रचंड दगड उचलताना बघितला. नानांच्या साधनेची सुरवात तेव्हापासून झाली.

मंत्राच्या उपासनेने मिळणाऱ्या सामर्थ्यावर त्यांचा अधिक भर. सकाळी चारला उठून नऊपर्यंत ते जपजाप्य उपासना करतात. सुमारे चाळीस वर्षे नियमाने गणपती-मारुतीला जातात. घराबाहेर पाऊल टाकल्यानंतर एकही क्षण 'श्रीराम जयराम जय जय राम ' या मनातल्या मनात चाललेल्या जपात ते खंड पडू देत नाहीत.

पिशाच्चे त्यांच्या मते दोन प्रकारची सोडलेली व लागलेली. पिशाच्यांचा जथा चाललेला असताना तो जेव्हा वाटेत येणाऱ्या माणसाला पकडतो त्यावेळी ते लागलेले



कृपासागर ऊर्फ नानासाहेब देव

भूत ते उतरविणे सोपे जाते. काही मांत्रिक मंत्र देवस्थानाजवळची वा इतर ठिकाणची भूते वश करून घेऊन त्यांच्यामार्फत काही माणसांना झपाटतात. ही सोडलेली भूते उतरवणे अधिक अवघड असते. अर्थात दुसऱ्याला त्रास देण्याचा हा उद्योग करणाऱ्या या दुष्ट प्रवृत्तीच्या माणसांनाही त्रास झाल्याशिवाय रहात नाही.

मुंबईच्या वेडयाच्या इस्पितळात काही कारणाने नानासाहेब गेले होते. एका पारशी कुटुंबातला एक तरुण मुलगा तेथे आणला होता. त्याचे वागणे, बोलणे महाराजांनी बघितले. ही केस निराळी आहे हे ओळखण्यास त्यांना वेळ लागला नाही. सिनेमाहून रात्री परतताना ओढयाजवळच्या एका फकिराकडून तो झपाटला होता. नानांच्या सांगण्यावरून त्याला परत घरी नेण्यात आले. गांजा, चिलीम, कटोरा, दारू आणि फकिराचे कपडे त्याच्यावरून उतरवून टाकण्यात आले. त्याच्या गळयात गोफ बांधला. दुसऱ्या दिवशीपासून तो खडखडीत बरा झाला. नाना-साहेबांच्या मते चेटूक करणाऱ्या स्त्रिया बहुधा खालच्या जातीतील अस्पृश्य समाजातील असतात. बंदिस्त धान्य आपोआप संपणे, शेजारच्या धान्याची रास आपो-आप वाढणे आणि त्याच वेळी आपली कमी होत जाणे हे सारे चेटकाचे प्रकार.

मूठ मारणे हा सर्वात अघोरी प्रकार असतो. अचानक रक्ताची गुळणी होऊन माणूस लगेच खलास होतो. हे लोक ७ रंगाच्या फडक्याची बाहुली करतात — सव्वा फूट, वा सव्वा दोन फूट उंचीची. तिची पूजा करून तिच्यावर एकवीस सुया, एकवीस टाचण्या, आणि एकवीस लिंबे शिवून टाकतात. अकरा मंत्रांच्या सहाय्याने ती भारण्यात येते. रात्री १२ वाजता विवस्त्रपणे स्वतःच्या विष्ठेच्या गोवऱ्या

करायच्या. त्या पंधरा दिवस जाळायच्या आणि त्या जळक्या गोवऱ्याने होणाऱ्या अंगाऱ्याच्या सहाय्याने मूठ मारावयाची असा हा प्रकार असतो. मूठ मारून माणसाला अनेक प्रकारे त्रास देता येतो. मांत्रिक प्रभावी असेल तर ती मूठ तो परतवू शकतो. तीन फूट व्यासाचा गोल करून त्यात मंत्राच्या सहाय्याने पिशाच्च बंदिस्त करता येते. या वेळी त्या माणसाने मांत्रिकाच्या डोक्याला हात लावण्याचा प्रयत्न केल्यास तो काळजीपूर्वक चुकवावा लागतो. काही ताकदवान पिशाच्यांचा मांत्रिकानाही त्रास झाल्याशिवाय रहात नाही.

भानामतीचे प्रकार हे कालिमाता व तिच्या भोवतालची पिशाच्चे यांचेमुळे होतात. ही गारुडी विद्या आहे. भूतगणांना ताब्यात ठेवून या गोष्टी घडवून आणल्या जातात. अंगात आलेल्या देवता या बहुधा पार्वतीचे अवतार असतात. आणि पुरुष हे शंकराचे.

नानांचीही मुलाखत घेताना त्यांची दुसरीही मुलाखत चालू होती. ती म्हणजे त्यांच्या कुलदेवतेची. माझ्याशी आणि आजूबाजूच्या लोकांशी बोलताना ते मधेच त्याच्या देवतेशी बोलू लागत, आजूबाजूच्या माणसांनी विचारलेल्या अनेक प्रश्नांची चर्चा आपण मित्रमंडळीत गप्पा मारतो तशा सहजपणे त्यांच्या देवीबरोबर ते करत. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांची माता मंजूळ आवाजात या सर्वांची उत्तरे त्याना देई. अर्थातच ती फक्त त्यांनाच ऐकू येई.

देवीची उपासना, त्यामुळे वाढणारे आत्मबल शुचिर्भूतता आणि पैशाबद्दलची निरिच्छ वृत्ती या सर्व गोष्टी या साधनेसाठी त्यांना अत्यावश्यक वाटतात. अखंडपणे केलेल्या मंत्राच्या तपश्चरणाचे पाठबळच यामागे आहे अशी त्यांची धारणा आहे.


---

## पिशाच्चबाधेवर मंत्र

बावन वीर छत्तीस जंजीर<br>
आग्यावेताळ मसण्यावीर } हे दोनदा म्हणावे<br>
खाता बोल त्याचा जीव बांधून, मार त्याचा हात<br>
बांधू पाहील त्याचे डोळे बांधू, बांध.<br>
बांधू नऊनाडी बांधू बहात्तर कोटी<br>
बांधू बांधू न बांधू<br>
काळ भैरवाची आण, गुरुची आण.<br>
माझी आण गुरुची शपथ भेटी.<br>
भगतफुरो मंत्र ईश्वरी वाचा.

टीप :– हातात उडीद, तांदूळ किंवा रक्षा घेऊन मी मंत्राने भारून अकरावेळा बाधा झालेल्या इसमावर फेकावी.

---



या यंत्राची पूजा षोडशोपचारे करून एक लक्ष बत्तीस हजारवेळा जप करावा. भूत, भविष्य, वाकसिद्धी व जनवशीकरण या गोष्टी याने सिद्ध होतात.

जप :— ॐ वेताळ निरलुच्छाय मम करणे भूतभविष्य वर्तमानम् बृही.

■

---

## पिशाच्चाचे गणित

तिथी : (पौर्णिमेपासून सुरुवात करून व पौर्णिमा एक मानून त्यापुढे मोजलेली) + वार (रविवारपासून सुरवात करून मोजलेला) + राशी ३ या बेरजेला ८ ने भागावयाचे. येणाऱ्या भागाकाराच्या संख्येवरून पुढील निष्कर्ष बांधता येतात.

०,२. देवता अंगात येणे.


७,३. इतर बाधा.

४,६ सर्व प्रकारची भूतबाधा.

१,५ बाधा नाही. शरीरभोग, शारीरिक आजार.

याच प्रमाणे नक्षत्र + तिथी + वार याना ८ ने भागून गणित करता येते.

---



विज्ञानाची घोडदौड अशीच चालू राहिली तर गूढ वाटणाऱ्या या साऱ्या च गोष्टी स्वच्छपण समजतील.

– रामभाऊ जोशी

'येथे जमलेल्या प्रत्येकाविषयी पूर्ण आदर ठेवूनही मी असे म्हणेन की, त्या कोणापेक्षाही कोणत्याही विषयातले ज्ञान रामभाऊंना अधिक आहे.' आमच्या मेडिकल कॉलेजात परिसंवादास आलेल्या रामभाऊंचा परिचय करून देताना महाराष्ट्रातील एका ख्यातनाम कॉलेजच्या प्राचार्यांचे हे उद्गार. तेथे जमलेल्या तज्ञांनीही या उद्गारांना दुजोरा दिला. रामभाऊंचा विलक्षण व्यासंग, सत्तरी-नंतरच्या वयातही दररोज चालणारे वाचन, विचारांची शास्त्रीय बैठक आणि अध्यात्मक तत्वज्ञान यामधील प्रत्यक्ष अनुभव हे सारे स्तिमित करणारे आहे

'मानसशास्त्रीय जडणघडण लक्षात घेतली तर या प्रकारामधील गूढता खूपच कमी होईल असे मला वाटते. एक उदाहरण देतो. चौथी शिकलेली आणि संस्कृतचा गंधही नसलेली एक मुलगी घडा घडा वेद म्हणताना मी बघितली आहे. तिचे सासरे मोठे वैदिक होते. साहजिकच सासरे अंगात आले हा सर्व सामान्यांनी केलेला तर्क. खरे कारण मला असे वाटते. सासऱ्यांची सेवा करण्याच्या निमित्ताने ती मुलगी दिवसातून खूपच वेळ त्यांच्या जवळ असे. मामंजीच्या पठणाचे संस्कार तिच्या Subconsious मनात लहानपणापासून नकळत उमटले होते. संस्कार नेहमीच खूप पक्के असतात. आवश्यक तेवढ्याच गोष्टी लक्षात ठेवण्याची आणि आठव-ण्याची मनाची मोठेपणी मिळविलेली कुवत आणि मानसिक तोल काही वेळा काही कारणाने नाहीसा होतो. या मुलीच्या बाबतीतही असेच झाले असावे. या Sub-consious मधील आपल्या मनाला मग वाट करून दिली आणि हे संस्कार मुखावाटे बाहेर आले. हे सहज आहे. शक्य आहे. संपूर्ण शास्त्रीय आहे.'

याचा अर्थ 'आपली मानसिक ताकद खूप मोठी असूनही आपल्यालाच ज्ञात नाही' असा करायचा का?

'ते आहेच तसे. आपल्या मेंदूतील मज्जापेशींची (Nervecell Neuron) संख्या बारा ते पंधरा अब्ज आहे. यापैकी सर्व पेशी जन्माच्या वेळीच तयार झालेल्या असतात. मग आपले शिक्षण म्हणजे काय? तर पंचेंद्रियांच्या मार्फत संवेदनाचें वहन मेंदूच्या विशिष्ठ भागाकडे करून त्यांचा अर्थ लावून घेण्याची क्रिया. हे वहनाचे मार्ग ज्ञान पंचेंद्रिय वगळूनही अनेकविध असतात. त्यामुळे मेंदूतील अनेक अज्ञात भाग प्रभावित करता येतात. मात्र यासाठी करावयाचा अभ्यास हा मनाचा अभ्यास असतो. संपूर्ण स्वतंत्र आणि सिद्ध अशी ही ज्ञान शाखा आहे. या अभ्यासातून मिळणाऱ्या शक्तिही तशाच ताकदवान असतात.'

'शारीरिक श्रमानंतर आपल्याला गळून गेल्यासारखे वाटते. खरे म्हटले तर या कामात आपल्या मेंदूची खूपच कमी ताकद खर्ची होत असते. प्रत्येक क्षणी आपल्या मनात चाललेले विचार आणि संघर्ष यात माणसाची अमर्याद ताकद खर्ची पडते. ही शक्ती वाचविता आली आणि केंद्रिभूत करता आली तर ती अणू शक्तीएवढी प्रचंड शक्ती असते हे ध्यानात येऊ शकेल.'

'हे कसे करायचे?'

'हा वेळ वाचविण्यासाठी मनाची पाटी संपूर्ण रिकामी अथवा कोरी (Blank mind) करता आली पाहिजे. दिवसातून काही वेळ तरी असे करता आले तरी खूप आहे. या अवस्थेत सहा महिने अथवा वर्षानंतरच्या काही घटना प्रत्यक्ष कळू वा दिसू शकतात. लेसार किरण निर्माण होण्यापूर्वी चारशें मैल अंतरावरची गोष्ट तुम्ही येथे बसून जाणू शकाल हे कोणी मान्य केले असते? मानसिक शक्तीची अशीच किरणे अथवा Waves असतात. पण नेमक्या दिशेने आणि तेवढ्या ताकदीने ती फेकता मात्र आली पाहिजे. या गोष्टी वैज्ञानिक कसोटीवर येत्या १०० वर्षांत सिद्ध होतीलच.'

'म्हणजे भानामती वगैरेसाठीही शास्त्रीय पाया असेल असे आपण मानता काय?'

'तो आहेच. प्रत्येक वस्तू ही Receiver असते. प्रश्न असतो तो त्या वस्तूचे ते स्वरूप ओळखून त्या प्रकारच्या Waves Unidirectional सोडावयाच्या. मात्र आत्मिक अथवा प्राणिक शक्तीचा हा अत्यंत हलका उपयोग समजावयास हवा. व्यवहारात तर शेकडा ९९.९९ गोष्टी खोट्याच असतात. पण त्याचे कारण म्हणजे हे करणाऱ्या लोकांचा धूर्तपणा. पण एवढ्यावरून या गोष्टींचे शास्त्रीय अस्तित्व नाकारता येत नाही.'

'पण मग वैज्ञानिक कसोटीवर ती गोष्ट सिद्ध करण्यास अडचण कोणती?'

'भानामती वा या स्वरूपाची कोणतीही विद्या दुरुपयोगाने नाहीशी होते. त्यामुळे स्वार्थासाठी त्याचा उपयोग करणाऱ्यांच्या जवळ ती अगदीच अल्पकाळ रहाते. ज्या सिद्ध पुरुषांजवळ ती असते त्यांना त्याच्या प्रदर्शनात काहीच रस नसतो. अंतिम ध्येयाकडे वाटचाल करत असता सहजपणे हे सामर्थ्य त्या मार्गात त्यांना मिळते आणि सगळ्या गोष्टी सध्याच्या प्रयोगशाळेत सिद्ध करता येतातच असे थोडेच आहे? ज्या वेळी तेवढीं सूक्ष्म उपकरणे निघतील त्या वेळी या Waves निश्चित नोंदविता येतील.'

'हातातून अनेकविध वस्तू निर्माण करणें, त्याचे समर्थन आपण कसे करता?'

'या गोष्टीत बऱ्याच वेळा खोटेपणा असतो हे मान्य. पण याचे शास्त्रीय स्वरूप असे स्पष्ट करता येईल. सर्वच वस्तू काही मूलभूत अणूंच्या बनलेल्या असतात. उदा. कार्बन, नायट्रोजन वा इतर यांचे विघटन वा एकत्रिकरण करून प्रयोगशाळेत या वस्तूची निर्मिती शक्य होते. हैड्रोजन आणि ऑक्सिजन यांच्या संयोगातून निर्माण करता येणारे पाणी ($H_2O$) हे जसे प्रयोगशाळेत विशिष्ट पद्धतीने होऊ शकेल तसेच तुमच्या स्वतःतील अंतरिक शक्ती जागृत करूनही करता येईल. या शक्ती, त्याचे स्वरूप, त्यावरची हुकमत या आज फार थोड्या लोकांना ज्ञात आहेत. आज हे सारे प्रयोगावस्थेत आहेत. या सर्वांचे स्वरूप स्पष्ट होण्यास खूप कालावधी लागेल. मात्र त्यावेळी ते सत्य वैज्ञानिक सत्याएवढेच ढळढळीत असेल. उदाहरण घ्याना. सोन्याला शास्त्रीय परिभाषेत Au197 म्हणतात.त्याच्यावर अल्फा किरणाचा मारा झाला तर, हैड्रोजनचा एक अणू बाहेर टाकला जावून त्याचे पाऱ्यात रुपांतर होते. (Hg200) अगदी अलीकडे प्रयोगशाळेत सिद्ध झालेली ही गोष्ट. अर्थातच हे काम प्रचंड गुंतागुंतीचे, ताकदीचे आणि खर्चिक असते. त्याच प्रकारे काही वेगळ्या पद्धतीने ही गोष्ट घडविता येते असे मला म्हणावयाचे आहे. त्याचे संपूर्ण स्वरूप पुढे यावयास मात्र बराच काळ थांबावे लागेल.'

'मरणोत्तर अस्तित्व आणि त्याचा माणसाला येणारा अनुभव आपण मानता काय?'

मरणानंतर माणूस वासनामय सूक्ष्म स्वरूपात अस्तित्वात रहातो. या बहुधा काही निराळ्या स्वरूपाच्या Waves असाव्यात. निधन अकाली असेल तर या Waves अधिक तीव्र असतात आणि त्याचे केंद्रीकरण त्या व्यक्तीच्या आवडीच्या माणसांवर होऊन त्याच्या परिणामाने या ना त्या स्वरूपात ते मृत माणसाची भेट

घडवून आणण्याची शक्यता नाकारता येणार नाही. या Waves, त्याचा परिणाम होण्याची मेंदूतील जागा त्यामुळे येणारे अनुभवाचे स्वरूप याही गोष्टी आज ना उद्या प्रयोगशाळेत सिद्ध होतीलच.

थोडक्यात विज्ञानाची विजयी दौड अशीच चालू राहिली तर आज गूढ वाटणाऱ्या अनेक गोष्टी उद्या निराळ्या स्वरूपाच्या पण वैज्ञानिक निकषावरच स्वच्छपणे समजल्या जातील.

---

## रेव्हरंड लेडबिटर

१. माणसाचा देह अनेक परमाणूंचा बनलेला असतो. सर्वसामान्यांना फक्त जड देहाची जाणीव असते. उपनिषदात या देहाला अन्नमय कोष म्हणतात. वस्तुत: माणसाचे देह पाच. बाकीच्या चार कोषांना प्राणमय, मनोमय, विज्ञानमय व आनंदमय अशा संज्ञा देण्यात आल्या आहेत.

२. जीवंत माणूस आपल्या सूक्ष्म देहाने जडदेह निद्रिस्त असताना भूवर-लोकी जाऊ शकतो. तिथे कधी कधी त्याची त्यांच्या आप्त स्वकीयांची भेटही होऊ शकते. या घटना निसर्गनियमाला धरून असल्या तरी सर्वसामान्य आणि सहजासहजी घडणाऱ्या नाहीत. मात्र साधारण माणसाला अशा घटना असतात याची कल्पनाही नसते.

३. मनुष्य मरण पावला म्हणजे इथर नावाच्या द्रव्याशी त्याच्या जड-देहाचा निगडीत झालेला भाग वेगळा होतो. या इथर द्रव्याच्या कोषात प्रत्येक माणसाचा वासनादेह लपेटलेला असतो. मरणोत्तर काही तासांनी हा कोष फुटतो. मृत माणसाच्या वासनादेहात जीवंत माणसाप्रमाणेच हुबे-हूब डोळे, नाक, तोंड इत्यादी अवयव असतात. परंतु त्याने तो पाहू शकणे, वास घेणे वा चव घेणे या गोष्टी करू शकत नाही. वासनादेहातील द्रव्य अत्यंत चंचल व गतीमान् असल्याकारणाने जडदेहातील विशिष्ट मज्जातंतु ज्या क्रमाने रूप, रस, गंध, स्पर्श आदीच्या बाबतीत जसे तत्पर आणि संवे-दनाक्षम असतात तसे वासनादेहात असू शकत नाही.

( रेव्हरंड लेडबिटर यांच्या इनर लाइफ ( Inner Life ) या पुस्तकाच्या आधारे. लेडबिटर हे कुंडलीने जागृतीची किमया साधलेले सत्पुरुष समज-ण्यात येतात.)

---

# मरणोत्तर अस्तित्व आहेच, पुनर्जन्मही आहे....

— स्वामी विज्ञानानंद

स्वामी आणि विज्ञान याचा मिलाफ आपल्या नावात साधणाऱ्या व्यक्तीबद्दल मला कुतुहल होते. स्वामी, महाराज या शब्दाने डोळयापुढे उभे रहाणारे, सोवळे-ओवळे मानणारे, पूजा-अर्चेत रमणारे, ध्यान-धारणेत गढणारे व्यक्तिमत्त्व याचा मेळ विज्ञानानंद या शब्दाशी कसाकाय बसत असेल याबद्दल मी साशंक होतो. विज्ञान म्हणजे परखडपणा आणि रोखठोकपणा. कुठलीही गोष्ट शास्त्राच्या कसोटी-वर घासून-पुसून सिद्ध झाली तरच स्वीकारावयाची, नाही तर फेकून द्यायची हे ब्रीद. विज्ञानामधून आनंद मिळवावयाचा म्हणजे तर विज्ञानाची उपासना सर्वात अधिक शुद्ध स्वरुपात करावयास हवी. माझा विषयच असा होता की छातीठोपपणे ह्या गोष्टी सत्य असल्याचे मानणारे भले भले पुराव्याची बात आली की विना-कारण अवघड भाषेत बोलायला लागत. काही वेळा हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. गरजच काय पुराव्याची ? असा उलटा प्रश्न मलाच विचारत. स्वामींनी सूक्ष्म देहात प्रवेश करण्याचे जाहीर करून या स्वरुपाच्या गोष्टींचा पुरावाच देण्याचे जणू कबूल केले होते. ऐनवेळी पोलिसांनी या प्रयोगावर बंदी घातली. या साऱ्या मुळे मुलाखतीबद्दल माझे कुतुहल अधिकच वाढले होते.

लोणावळयाबाहेरची निवांत जागा. गर्द झाडीत लपलेली छोटीशी बंगली. पुढच्या बाजूला ऑफिस, आत ध्यानाची खोली. अंगावर तरटाचे वस्त्र. तसलेच कापड कमरेला गुंडाळलेले. मागच्या कपाटात स्वतःची सारी पुस्तके, संख्या शेकडयाच्यावर. व्यवस्थितपणे लावलेली. वेळ सकाळची साडेनऊची. आमचे संभाषण चालू होते.

'...लेखणी हातात धरायचे बंद करून आता दोन महिने झाले, मग तुम्ही पत्रकारांनी पाठलाग चालू केला. सकाळ झाला, केसरीचे लोक आले, फ्रीप्रेसचेही येऊन गेले. मग तुम्हालाच कसा नकार देणार ? त्यातूनही तुमचे काम लोक-शिक्षणाचे.'

' पण अनेक खोटया कल्पनांना कवटाळून बसल्याने हे काम विकट होत आहे. एकतर याला वैज्ञानिक बिनतोड पुरावे सादर करावयास हवेत. नाहीतर ते थोतांड

म्हणून वेशीवर टांगायला हवे.' मी मुद्यालाच हात घालत म्हणालो.

'तुम्हाला नेमके काय हवे ?'

'मरणोत्तर अस्तित्वाचा विषय घ्या. आपण हे अस्तित्व मानता का ? कोणत्या स्वरुपात ? आणि त्याला वैज्ञानिक पुरावा काय ?'

'मरणोत्तर अस्तित्व आहेच–पुनर्जन्मही आहे. आपले सध्याचे अस्तित्व म्हणजे तरी काय ? जन्माच्यावेळी आपल्या हृदयाचे ठोके साधारण १२० पडत असतात. वृद्धपणी कमी कमी होत जाऊन ते साठपर्यंत येतात. थोडक्यात मिनिटाला १२० ठोके ते ६० ठोके देण्याची शक्ति हा उतरत्या भाजणीचा काळ म्हणजे गणिताचे व्याख्येने आयुष्य. उष्णता शक्तिच्या भाषेतही हीच गोष्ट सांगता येईल. लहान मोठे वय धरून साठीपर्यंत जगणारा माणूस साधारणपणे दिवसाला तीन हजार कॅलरीची उलाढाल करतो. म्हणजे ५ ते ७० किलोचा गोळा (देह) ६० वर्षे ३७ से. ग्रे. गरम ठेवण्यात ३००० कॅलरी × ३६५ दिवस × ६० वर्षे = ६,५७,००,००० सहा कोटी सत्तावन्न लक्ष कॅलरी इतकी शक्ति लागते. माणसाच्या मनाची जन्माच्या वेळची शक्ति २१ कोटी कॅलरीज निर्माण करण्याइतकी असते. देह सोडताना मनाजवळ १४ कोटी कॅलरीज शक्ति शिल्लक रहाते. मरणानंतर मन ह्या असह्य उष्णतेला चिकटते. जन्मात जेवढी आवडनिवड अधिक सूक्ष्म, स्वार्थी किंवा नाजूक त्या तुलनेने मरणोत्तर दुःख अधिक. इच्छा हा मनाचा धर्म. तो मनाबरोबर जातो. आवडीनिवडीच्या काटेकोर पातळीप्रमाणे दुःख भोगतो. त्यातून इच्छा उरली, दुखः भोगून पुरेशी उष्णता शक्ति मनांच्या कोशात पुन्हा भरली गेली, की एखादे शरीर गुंफण्याच्या लालसेला तो पुन्हा लागतो. असे हे चक्र आहे. मरणोत्तर तिप्पट चौपट उष्णतेत मन होरपळून निघते. थर्मोडायनामिक्सच्या दुसऱ्या नियमाप्रमाणे ज्याअर्थी जन्मणारे बालक मोठी उष्णताशक्ति घेऊन जन्मते; त्याअर्थी तेवढ्या प्रचंड उष्णतेच्या सहवासात ते मन मरणानंतर रहात असले पाहिजे.'

माझा गोंधळ दूर होण्याऐवजी अधिकच वाढला. 'पण हे पुढचे सारे शास्त्रीय कसे मानायचे ?'

'जड पदार्थाशी असलेल्या संबंधाने शास्त्राला नेहमीच मर्यादा पडतात. Science should deal with truth but it deals with matter but it should not... पुरावा मिळू शकतो, वस्तूंचे अस्तित्व असेल तर. मॅटरपेक्षाही जी गोष्ट सूक्ष्म आहे, त्या अणूच्याही आरपार जाणारी आहे, त्याला पुरावा कसला देणार ? तरीही तीन पुरावे संभवतात. एक म्हणजे तार्किक, दुसरा गणिताचा आणि तिसरा सैद्धांतिक पदार्थ विज्ञानाचा. आइस्टाइनने प्रमेय मांडले. त्याला बावीस वर्षांनी पुरावा मिळाला. पुराव्याच्यामागे हातधुवून लागण्यात आणि वस्तुस्थिती नाकारण्यात म्हणूनच मला अर्थ वाटत नाही.'

पुराव्याच्या पुराव्यामागे न लागता मी पुढच्या मुद्यात घुसलो. मरणोत्तर अस्तित्व पिशाच्च योनी, भूत उतरविण्याची ताकद, ही सगळी एकात एक गुंतलेली प्रकरणे. अतृप्त वासनामय शरीर हे मृत्युनंतरच्या मानवी–अवस्थेचे वर्णन स्वामींना फारसे पटले नाही. त्यांच्या मते जगत असलेल्या प्रत्येक क्षणि पूर्वायुष्यातील सर्व अतृप्त इच्छा आणि वासना तुम्ही Represent करता. म्हणजे प्रत्यक्ष जगत असतानाच तुम्ही भूत नाही का ? मरणोत्तर अस्तित्व स्वामी मानतात. पण भूत लागणेही गोष्ट रूढ अर्थाने त्यांना मान्य नाही. त्यांच्या मते भूतयोनीत भुताला होणाऱ्या यातनाच एवढ्या भयंकर असतात की दुसऱ्यालाच झपाटण्याची ही उचापत त्याला परवडणारी नसते. भूत हमखास पळवून लावतो, असे म्हणणाऱ्या लोकांचेही त्यांना हसू येते. त्यांच्यामते हे कसे शक्य आहे ? शत्रू आहे–मॅटरच्या पलीकडचा आणि धूप, अगारे, पिवळा भात, कोंबडी, या गोष्टीचा त्याच्यावर परिणाम होणारच कसा ? भुताने झपाटले असेल तर दोनच प्रकारची सुटका संभवते. आपण केलेल्या वर्तुणकीच्या दुराचाराचे फळ म्हणून त्या व्यक्तीला ते दुःख भोगायला लागत असते. स्वतः मनोभावे माफी मागावी, चुकांची कबुली द्यावी. प्रायश्चित्त घ्यावे. हाच उपाय यावर संभवतो. एखाद्याने वाईट हेतूने असा त्रास दिला असेल, हे शक्य आहे. पण त्यातूनही प्रार्थना व शुद्धाचार यामुळेच ती व्यक्ति वाचू शकेल.

देवता अंगात येणे याबाबत मानस शास्त्रज्ञांचे मत मला बहुतांशी मान्य आहे. आईभवानी ही सर्व शक्तिमान देवी महाराजांच्या अंगात यावयाची. मग तिने त्यांना भवानी तलवारच का दिली ? अॅटमबाँब का नाही दिला ? हा माटेंचा सवाल स्वामींना पटू शकतो. चेतनाशक्तीच्या पलीकडे आत्मा असतो. विज्ञानानंद माणमातला देव कशाला मानतात ? त्यातल्या त्यात कमी अपूर्ण, चेतन जे लोकाचे

---

## विष परीक्षा

राजस्थान विद्यापीठात या सर्व विषयाचे संशोधन करणारे डॉ. बॅनर्जी यांनी १९५८ साली माईंड सायन्स फाउंडेशन सॅन डिआगे टेक्सास यांच्या मदतीने सापाचे विष उतरवितो म्हणणाऱ्या मांत्रिकाचा अभ्यास केला. अनेकांच्या भेटी घेतल्या. साप चावलेल्या प्राण्यावर त्यांनी उपचार करावयास लावले. सगळ्या खटाटोपातून निष्कर्ष निघाला की विष उतरवितो म्हणणाऱ्यापैकी कोणाजवळही खरी शक्ति नव्हती. भयंकर विषारी साप चावलेला एकही माणूस वाचू शकला नाही. तथाकथित अद्भुत शक्ती शास्त्रीय निकषावर घासल्या गेल्या की कशा फोल ठरतात त्याचाच हा पुरावा आहे.

---

भले करू इच्छिते आणि पूर्णत्वाकडे प्रवास करते त्याला या मागची आत्म्याची पातळी माणसाला मिळत नाही. म्हणूनच देव अंगात येतो. गोष्टीवर विश्वास ठेवणे जड जाते.

यानंतर चर्चेचा ओघ 'भानामती'कडे वळला. भानामती म्हणजे काय ? त्याला वस्तूनिष्ठ विवेचन देता येईल काय ?

'हे बघा डॉक्टर, ह्या गोष्टी यापूर्वीच सिद्धही झाल्या आहेत. त्याही ही सगळी भंपकगिरी मानणाऱ्या कम्युनिस्ट रशियामध्ये. नजरेने ब्रेड हलविण्याच्या प्रयोगामागे नेत्रशक्तिशिवाय इतर कोणतीही बनवाबनवी नाही. हे १९५९ साली रशियाच्या टास एजन्सीने जाहीर केलेले मत आहे. या स्वरुपाची ताकद जाणीवपूर्वक साधनेने वा वंशपरंपरेने मिळू शकते. Evil spirits वर ताबा मिळवूनही ह्या गोष्टी करून घेता येतील. अर्थात या सगळ्यांचेच स्वरूप राहणार मॅटरच्या पलीकडचे. त्यामुळे प्रयोगशाळेत या यशस्वी प्रयोगामागचो सिद्धता अज्ञातच रहाणार. एक गोष्ट मात्र नक्की. खरोखरच ह्या गोष्टी घडवू शकणाऱ्या माणसाला नाडीच्या ठोक्यातील बदलाशिवाय हे करता येणार नाही. यावरून त्याच्या खरेखोटेपणाचा पडताळा मिळू शकेल.

'हातामधून वस्तू निर्माण करण्याच्या प्रकाराबद्दल तुमचे काय मत आहे ?'

'मूळ घटकापासून अशा गोष्टी तयार करता येतील. पण त्याला प्रचंड ताकद लागेल. तांदळाला बायॉलॉजिकल Value आहे. म्हणून त्याची अशी निर्मिती सोन्याहून अधिक अवघड असेल. पण बहुतेक वेळा त्यामध्ये दोन प्रकार संभवितात. हे

---

## साप-विंचवाच्या विषावरचा मंत्र

देव लिंग गुरु वरुत्तज बडे पान
उतारने लगे देख्याशेख्या
गुरुवरड सो परम गुरु
सिद्ध फुरे श्रीमहादेवकी सिद्धो फुरे

याप्रमाणे सापाचे विष उतरविण्याचे निरनिराळे २१ मंत्र आहेत. ते सर्व सिद्ध आहेत. कोणत्याही एका मंत्राचा जप केल्यास सामर्थ्य लाभू शकते. पाळावयाचे नियम खूपच कडक असतात. उदा. नाग, साप हा शब्द दिवसात कानावर जरी पडला (नागपूर) तरी देखील जेवायचे नाही. जाऊन अंघोळ करावयाची वगैरे.

---


लोक वस्तू निर्माण करू शकत नाहीत. मात्र काही प्रमाणात त्या हलवू शकतात. उदा० कफनीतील वस्तू हाताच्या मुठीपर्यंत कोणत्याही हातचलाखीशिवाय प्रत्यक्ष योगिक सामर्थ्यांने हलविता येईल. मास हिप्नोटाईजच्या–प्रकाराची शक्यता नाकारता येत नाही, हेही नमूद करून ठेवावयास हवे.


ज्या सवंगपणे या गोष्टीचा उपयोग काहीजणांकडून केला जातो; त्याच्या मात्र मी विरुद्ध आहे. ही शक्ति उपयोगात आणली पाहिजेच असेही नाही. किंबहुना असा साधक ही शक्ती उपयोगात आणत नाही. कारण समाजाचे वरील पातळीवरचे हित त्याला साधावयाचे असते.

मंत्राने सापाचे विष हमखास उतरवितो, म्हणणाऱ्या मांत्रिकाचे प्रयोग हाफकिन इन्टिट्युशनचे प्रमुख डॉ. देवरस आणि स्वामीजी यांच्यासमोर झाले होते आणि बिचारे ससे तडफडून मृत्युमुखी पडले. थोडक्यात प्रयोगाने ही गोष्ट अजून सिद्ध झालेली नाही. पण शरीरात घुसलेले Matter काढून घेता येईल. ही तात्त्विक भूमिका मात्र मान्य करता येण्याजोगी आहे, स्वामीजींच्या मते.

दोन अडीच तासाचा वेळ उडून गेला होता. प्रायोगिक सिद्धतेशिवाय Therotical possibliity म्हणून या गोष्टी मानण्यात मुळातच काही चूक आणि धोका आहे काय ? हा विचार बाहेर पडताना माझ्या मनात घोळत होता.

■





# आपण त्रिमितीच्या तर्कशास्त्राने जाणतो त्यापेक्षाही पलीकडे काही अमाप शक्ती आहेत....

— पू. दत्ता बाळ

होय, तुमच्या साऱ्या प्रश्नांना मी विज्ञानाच्या परिभाषेतच उत्तरे देईन. यात तुमची सोय आपोआप होईल. हा भाग निराळा, [पण माझी विचारसरणी ही संपूर्णपणे शास्त्रीय निकषावरच घासूनपुसून तयार व्हावी ही दक्षता मी पहिल्या-पासूनच घेतली आहे.


'आपल्या साऱ्या विचारसरणीचे मूळ सूत्र कोणते ?'

'उत्क्रांतीवादाची सर्वंकशता आणि सूत्रबद्धता याचा नीट उलगडा विज्ञानाच्या सहाय्याने आणि स्वतंत्र प्रज्ञेने घेणे हा माझ्या विचाराचा गाभा म्हणून सांगता येईल. उत्क्रांतीच्या क्रमानुसार मृत्यु हा मानवी जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पण मरण म्हणजे काही शेवट नव्हे. जीवनाच्या अधिक विकसित स्वरुपाकडे नेणारा तो एक टप्पा. अखंडपणे विश्वचेतनेकडे प्रवास करणाऱ्या प्रेरणांचा मरण हा या अर्थाने मी एक खुणेचा दगड वा टप्पा मानतो. मृत्यूनतर माणूस सूक्ष्म देहात प्रवेश करतो. आणि या स्थितीतून प्रत्येकाला जावेच लागते. मरणोत्तर अस्तित्व म्हणजे शक्तीचे परिवर्तन. डॉ. ऑलिव्हर मायर यासारख्या पदार्थविज्ञानाच्या आणि मानसशास्त्राच्या तज्ञांनी याबाबत खूपच प्रकाश टाकला आहे.'

'भानामतीचे प्रकार हे या अतृप्त आत्म्याचे खेळ आहेत का ?'

'आपण त्रिमितीच्या तर्कशास्त्राने जाणतो, त्यापेक्षाही पलीकडे अमाप शक्ती व अद्‌भुतता आहे. त्यातलाच एक भाग म्हणजे Spirit. शरीर नसलेले हे आत्मे आपल्या भोवतालच्या वातावरणात वावरत असतात. त्याच्याकडून हे करवून घेतले जाते. या चमत्काराची मर्यादा म्हणजे हे आत्मे विशिष्ठ परिघातच फिरू शकतात. यांचा उपयोग स्वार्थासाठी आणि दुसऱ्यांना त्रास देण्यासाठी केला तर त्या माणसाचे शेवटी वाटोळेच होते.'

'हातातून वस्तू निर्माण करणाऱ्या लोकांच्या सामर्थ्याचे याच प्रकारे स्पष्टीकरण करता येईल काय ?'



—पू. दत्ता बाळ

'एक गोष्ट स्पष्ट करावयासच हवी. भानामती वा वरील प्रकारचे प्रयोग करणाऱ्यामधील हजारामध्ये एखादाच सच्चा असतो. बाकीची सारी भोंदूगिरी. पण या गोष्टी शक्य आहेत. हे मात्र निर्विवाद. अदृश्य पिशाच्चाच्या सहाय्याने त्यांच्यावर ताबा ठेवणारे लोक त्यांच्याकडून आपल्या हातामध्ये या वस्तू आणवून घेतात पण दुसरी बाजू अधिक महत्वाची. प्रत्येक अणूची Electron, Proton, वगैरे काही विशिष्ट रचना असते. त्या अणूचे स्वरूप त्यामुळे नक्की केले जाते. यामुळे एका वस्तूचे दुसऱ्या वस्तूत रूपांतर शक्य होते. This Universe is Porous, हे विश्व छिद्रमय आहे. हा मान्यवर शास्त्रज्ञांनी मान्य केलेला सिद्धांत आहे. या छिद्रमय विधानातून योगी वस्तूच्या घटकांचे विघटन करून प्रथम त्या स्वतःकडे आणतो. आणि नंतर पुन्हा त्यांचे संयोगिकरण करून वस्तू निर्माण करतो. या प्रकारे दुसऱ्या कोणत्याही ठिकाणची वस्तू योग्याच्या हातात तयार होते. या हातातून कोणत्याही गोष्टीचे तो रूपांतर करू शकतो. यासाठी खर्च पडणारी शक्ती अतिशय प्रचंड असल्याने केवळ अल्पप्रमाणातच या गोष्टी करता येतात.'

'एखाद्या व्यक्तीने जरी या स्वरुपाची कसोटी जाहीरपणे दिल्यास काय हरकत आहे ? त्यामुळे त्यांचे सामर्थ्य कमी होईल काय ?'

व्यक्तिगत माझ्या मते अशी कसोटी देण्यास कोणतीच हरकत नाही. या गोष्टी सत्य आहेत. आणि भोवतालची खोटी गूढता बाजूला सारून त्या लोकांच्यापुढे आल्यास केव्हाही चांगले. त्यामुळे त्या व्यक्तीचे सामर्थ्य कमी होईल हेही मला

पटत नाही. पण परदेशात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांच्यापुढे याचे प्रयोग झाले आहेत. आणि या गोष्टी निश्चितपणे सिद्ध झाल्या आहेत. म्हणून केवळ हट्टाने आग्रह धरणे फारसे सयुक्तिक नव्हे.

'मंत्राच्या सहाय्याने अंगातले भूत वा इतर बाधा उतरविणे. याचा वैज्ञानिक संदर्भ आपण कसा लावता ?'

Every body emits vibrations हे शास्त्रीय सत्य आहे. डॉ. किलनर आणि इतरही काही जणांनी हे सिद्ध केले आहे. बाहेर पडणाऱ्या या Vibrations चा तोल भूत लागल्यावर बिघडतो. खरा मांत्रिक आपल्या प्रभावी शब्दोच्चारांच्या आणि मंत्राच्या सहाय्याने जी कंपने निर्माण करतो त्यामुळे हा तोल पुन्हा सावरला जातो.


'अतिमानवी शक्ति म्हणजे काय ?'

'विषय खूपच गहन आहे. थोडक्यात सांगतो. लांबी, रुंदी, उंची या त्रिमित जगाचे काल हे चवथे परिमाण आहे. बौद्धिक शास्त्राच्या आधारे सिद्ध होत असलेले हे अस्तित्व आहे. चमत्कार इतकेच सिद्ध करतात की बौद्धिक विश्वाला आधी बौद्धिक परिमाणे आहेत. स्थल व काल यांचा संगम योगसामर्थ्याने आपण आपल्या अंतरंगात घडवू शकलो तर आपल्याला भूत, भविष्य, वर्तमान काल स्वाभाविकच स्पष्ट दिसू लागतात. या ठिकाणी मेंदू आणि मन याचा फरक जाणीवपूर्वक करावयास हवा. माझ्या मते Brain is a vehicle of consciousness आहे तर center of consciousness आहेत योगातील षट्चक्रे, ते आपले मंत्र. त्याचा जाणीवपूर्वक अभ्यास आणि त्यातून प्राप्त होणारी अद्‌भूत सामर्थ्ये हे एक संपूर्ण सिद्ध शास्त्र आहे. या सर्व विज्ञाननिष्ठ कल्पनांची विचारांची प्रयोगाची दखल न घेता त्यावर उगीचच तुटून पडणाऱ्या साम्यवाद्यांची म्हणूनच मला चीड येते....'

बहुतेक सारे विचारून संपले होते. त्यांच्या साधनेची वेळ झाली होती. आम्ही एकमेकांत निरोप घेतला.

## कुंडलीनी जागृतीचा मंत्रराज

ॐ नमो भगवती, राजराजेश्वरी, सागरतीर महामाया,
पूरनिवासिनी, महाकाली महालक्ष्मी, महासरस्वती अन्नपूर्णा.
शक्तिदेवी, दबे, माते, उदयोस्तु, उदयोस्तु, उदयोस्तु
ऐम्, ऱ्हिम्, क्लिम्, श्रीम्, याम्, ग्राम्, लाम्, शम्, दम्, वम् तम्



मी एक सत्यसंशोधन मंडळ काढणार आहे,
अशा गडबडगुंडा जिथे चालू असेल तिथे....


डॉक्टर, खरं सांगू. हे सारे थोतांड आहे, मला चीड येते या साऱ्या फसवाफसवीची आणि कीव वाटते–तुम्हा तरुण लोकांची ! विज्ञानाचे उपासक म्हणणारे हे तरुण का नाही सारा बनाव वेशीवर टांगत ?'

आपल्या जादूविद्येच्या सहाय्याने सारे जग पायाखाली घातलेले रघुवीर मोठ्या पोटतिडिकीने मला सांगत होते.

मीही इच्छाशक्तीच्या जोरावर वस्तू जागेवरून हलवितो, स्वतः अदृश्य होतो, माणसाला हवेतून फिरवितो, हातातून पाहिजे तो पदार्थ निर्माण करतो. टेलिपथीचे प्रयोगही दाखवितो. मात्र आधीच प्रेक्षकांना सांगितलेले असते, मी तुम्हाला फसविणार आहे. प्रेक्षक कडाडून टाळी देतात ते झक्कपैकी फसविल्याबद्दल. मामला कसा खुल्लंखुल्ला.

पण यांची भानामती बघावी तर सारेच अजब. हजार, दोन हजार लोकांची घराभोवती गर्दी. उत्सुकतेने ताणलेल्या नजरा. मग अलगद तरंगत खिडकीतून खाली येणारी एखादी पट्टी, फुलपात्र वा झंपर. भानामतीच्या नावाखाली चाललेला तो लबाडीचा खेळ मूर्खासारखे बघण्यात हजारो लोकांचे हजारो तास वाया जातात. या वेळेला काहीच का किंमत नाही ? एक ना दोन, दीडशेहून अधिक केसेसचा मी अभ्यास केला आणि या गोष्टीत शंभर नंबरी खोटेपणा असतो. हे माझे मत प्रत्येक वेळा शंभर टक्के खरे ठरले.

रघुवीरांना आलेले हे अनुभव खरंच मोठे ऐकण्यासारखे आहेत.



— जादूगार रघुवीर

मुलगी ट्रेनिंग कॉलेजात शिकायला हॉस्टेलवर रहाते आणि तिच्या सर्व अंगावर, कपड्यांवर न कळत बिब्ब्याच्या फुल्या उठतात. म्हणून एक त्रस्त पालक त्यांच्याकडे आले होते. घरी आलेले सारे अन्न, अगदी समोरच्या हॉटेलातील चहादेखील कडूजार होतो. यासाठी एक मारवाडी कुटुंब हैराण झाले होते. मुलीच्या अंगातून सुया निघतात म्हणून हॉस्टेलचे रेक्टर गोंधळून गेले होते. दहा वर्षांच्या मुलीच्या डोळ्यापुढे एकदम पांढरी आकृती दिसते आणि मुलीच्या केसाच्या बटाच गळतात, म्हणून एका मुलीचे वडील वैतागले होते. सुरुवातीला सांगितलेला भानामतीचा प्रकार पुण्याच्या शिवाजीनगरमध्ये हजारोंच्या डोळ्यांसमोर घडत होता. भांगरवाडीच्या मित्राच्या घरी रात्री अपरात्री अचानकपणे कोठून तरी येऊन घाणीचे मडके फुटत होते. भिंतीवर चित्रविचित्र सावल्या नाचत होत्या. तक्रार घेऊन आलेल्या प्रत्येकाची प्रसंगाची मांडणी आणि बोलण्याची धाटणी अशी होती की, कोण्या पिशाच्चाचीच ही करणी वाटावी. नामवंत भारतीय जादूगार म्हणून या साऱ्यावर अंगाऱ्या, धुपाऱ्यांचे दैवी उपचार करून त्याची मुक्तता करावी अशी या सगळ्यांची रघुवीरांना विनंती होती.

काहीतरी दैवी अतिमानुष शक्ती, भुतेखेते यांच्या सहाय्याने हे होऊ शकते. याच्यावर रघुवीरांचा साफ विश्वास नसल्याने ते एकदम मुद्यालाच हात घालत. अंगावर बिब्ब्याच्या फुल्या उठणाऱ्या मुलीच्या हातात त्यांनी पत्त्याच्या कॅट दिला. मुलीने उचललेले पान क्षणाचाही विलंब न करता ओळखून दाखविले. मग धारदार आवाजात आपले भेदक डोळे तिच्यावर रोखून प्रश्न केला—'हा पत्ता जसा

मला तुझ्या डोळयांत दिसला, तसे या फुल्या उठण्याचे कारणही मला तुझ्या डोळयात वाचता आले. खरे सांग, हा सारा बनाव कशासाठी? फसवायचा प्रयत्न बिलकुल करू नकोस. करणी उलटवली जाऊन तुझ्या आईवडिलांना त्याचा त्रास होईल.' मुलीने आधी खूप आढेवेढे घेतले, त्रागा केला. साऱ्या अंगावर उठणाऱ्या फुल्या पाठीच्या ज्या ठिकाणी हात पोचू शकत नाही त्याच ठिकाणी नेमक्या कधीच कशा उठल्या नाहीत?' या प्रश्नावर मात्र ती गडबडली. आपल्या इच्छेविरुद्ध आपणास शिकावे लागत आहे. लग्न करायची इच्छा आहे. गावी असलेल्या प्रियकराला भेटावयास जाण्याचा सोपा मार्ग म्हणून मी स्वतःच फुल्या काढते. यामुळे हॉस्टेल चुकते आणि खूप दिवस गावी मुक्काम टाकता येतो. हा गौप्यस्फोट तिने केला. मुलीच्या लग्नानंतर ही भानामती थांबावी यात काय नवल?

घरातल्या खाण्याच्या साऱ्या वस्तू कडू होतात, यावर रघुवीराने सरळच सांगितले, 'तुमच्या घरी मी सपत्नीक येऊन मुक्काम ठोकतो, बघुया कोण हरतो ते.' अहो किती साधी गोष्ट. रघुवीर हसत म्हणाले. 'कोयनेलचे दोन थेंब साखरेत टाकले तर काहीही न कळता सारा चहा कडूजार होतो. कळत न कळत ते भांड्याला आतून किंचितसे जर लावले तर आतल्या सगळया अन्नाला तीच चव येते. देणेकऱ्यांना थोडं थांबविण्यासाठी आणि जमले तर देणी चुकविण्यासाठी डाके वाजवून शेठजींनी काढलेली शक्कल होती. मात्र ते सोडून घरातल्या कोणालाच पत्ताही नव्हता.

अंगातून सुया निघण्याच्या प्रकारात जपानचा दौरा त्यांना उपयोगी पडला. संधीवात व इतर अनेक रोगांवर अंगात सुया संपूर्णपणे टोचून उपचार करणारे लोक जपानमध्ये आहेत. त्यांना सरकारी मान्यतेचा डिप्लोमाही असतो. वाटते तेवढी ही गोष्ट मुळीच दुखणारी नसते. काही मानसिक त्राग्यामुळे ही मलगीच स्वतः खाडसाळपणे या गोष्टी करते हा तर्कच शेवटी खरा ठरला.

शाळेतले मारणारे मास्तर आणि अवघड अभ्यास यापासून सुटण्यासाठी आपण स्वतःच बट कापून ठेवतो आणि कोणीतरी भयंकर पांढरी आकृती दिसल्याचे नाटक करतो हे त्या अकरा वर्षाच्या मुलीने स्वतःच कबूल केले. शाळा बदलल्यावर भुताटकी एकदम थांबली. भानामतीचा प्रकार हा असाच आर्थिक अडचणीतून सुटण्यासाठी टाकलेला डाव होता. खाली पडल्या तर फुटतील अथवा नुकसानी होईल अशी एकही वस्तू महिन्यात घरातून बाहेर पडू नये हे कशाचे लक्षण? घरातील मुले बाहेर पाठविल्यावर, घराच्या दारे, खिडक्या बंद केल्यावर वा खोल्याखोल्यांतून माणसे बसविल्यावर हे प्रकार लगेच बंद झाले. पोलिसाने घरमालकाला दम दिल्यावर भानामतीने पळच काढला हे कशाचे लक्षण? शेजारच्या माणसाने घर सोडावे म्हणून रात्री हळूच कौले काढून घाणीचे मडके आत फेकण्याचा आणि बॅटरीच्या पुढच्या बाजूस काळे करून त्यावर वेड्यावाकड्या आकृत्या काढून भुते

नाचविण्याचा नीचपणा तर प्रत्यक्ष व्यक्ती पकडून रघुवीरांनी उघडकीला आणला.

'सर्वसामान्यांची गोष्ट सोडा डॉक्टर, पण कल्पक आणि धाडशी म्हणून स्वतःची प्रौढी मिरविणारा तरुण वर्ग का नाही सत्य शोधण्याच्या या कामासाठी पुढे येत ? हातातून अंगारा, कुंकू, केसातून सोन्याचे हार आणि मंगळसूत्र आणि पाण्यातून खडीसाखर काढणारे अनेक सत्पुरुष योगी आपल्या समाजात वावरतात. डोळ्यावर एवढे झापड आपण बांधलेले असते की आपण हे सारे अगदी खरेच मानतो. इस्लामपूरजवळच्या बहेगावातील एका संत माणसाला मी चांगलाच चमकविला होता. बोलता बोलता महाराज हवेत हात फिरवीत आणि खोबऱ्याचा प्रसाद भक्तगणांच्या हातावर ठेवीत. भक्तगणांच्या गर्दीत ही लबाडी उघडकीस आणण्यासाठी मी मिसळलो. मी तो प्रसादाचा तुकडा हातावर घेतला. त्याचा केला रुपया. महाराजांच्या हातून अंगाऱ्याच्या पुडीचा कागद घेतला. त्याची केली शंभर रुपयाची नोट. आश्चर्याने बघणाऱ्या भक्तगणांना म्हणालो, 'मी कोणीही सिद्ध पुरुष नाही. मला हे मान्य आहेच. आता घ्या ह्या तुमच्या महाराजांची झडती. खोबऱ्याचे तुकडे अंगावर दडवून ठेवलेले निघाले नाहीत तर सांगाल ती पैज हरेन.' महाराज हे ऐकायला थांबले कुठे ? दाणदाण पावले आपटत ते चालते झाले. लंगोटावर रिकाम्या हाताने उडी मारून पाण्यातून खडीसाखर काढण्याचा प्रकार असाच फसवेगिरीचा. उडी मारायच्या ठिकाणी दगडाखाली छोट्या बंद बाटलींत आधीच खडीसाखर घालून ठेवलेली. बूच काढून ती हातात घ्यायची आणि मंत्र म्हणत वर यावयाचे की झाली महाराजांची पाण्यातील खडीसाखर तयार.

'आपण या क्षेत्रातले तज्ञ म्हणून विचारतो – रोप ट्रिक या नावाने जी अस्सल भारतीय जादू प्रसिद्ध आहे तिच्यामुळे या स्वरुपाच्या अतीमानवी शक्तींना पाठिंबा नाही का मिळत ?' माझे बरेच दिवसाचे कुतुहल उघडे करत मी विचारले.

रघुवीर मनापासून हसले. 'अहो तिखट मीठ लावून प्रवास करणाऱ्यांच्या सुपीक डोक्यातून ही कल्पना जन्माला आली. एका संस्थानिकाच्या दरबारात यांनी म्हणे दोरखंड (रोप) बिना आधार उभा करणारा फकीर बघितला. पुढे मग त्या दोरावरून फकिराचा मुलगा आणि फकीर वर चढून गेले. हा भाग त्याला जोडला गेला. मग त्या फकिराने मुलाचे तुकडे करून खाली टाकले. ह्या पद्धतीने या गोष्टीचा विस्तार झाला. पुन्हा फकीर खाली आला, आणि त्याने तुकडे जोडून मुलगा परत तयार केला. या ठिकाणी ही भारतीय रोप ट्रिक उर्फ अस्सल लोणकढी थाप पूर्ण झाली.'

'म्हणजे यात काहीच तथ्यांश नाही ?'

'मुळीच नाही. या रोप ट्रिक करणाऱ्या फकिरांना शोधून काढण्यासाठी परदेशी होशी प्रवाशाने आणि जादूगाराने जंग जंग पछाडले. मुद्दामहून भारताचे दौरे

आखले. जंगले आणि आदिवासींचे प्रदेश पालथे घातले. पण यापैकी साधी पहिली गोष्ट देखील दाखवू शकणारा त्यांना कोणी भेटला नाही. गंमत तर पुढे आहे. मी इंग्लंडला होतो त्यावेळी आपणाला ही रोप ट्रिक करणारा माणूस भेटला, म्हणून एकाने मोठ्या प्रौढीने त्या ट्रिकची घेतलेली फिल्म दाखविली. क्षणभर सगळे चमकले. सिनेमामध्ये ट्रिक सीन तयार करणाऱ्या माणसाला बोलविण्याची सुपीक कल्पना एकाने काढली. फिल्म दाखविणाऱ्याचे बिंग फुटायला आणि ट्रिक फसायला अर्थातच वेळ लागला नाही.'

'डॉक्टर, मरणोत्तर अस्तित्व अतीमानुश शक्ती या गोष्ठी जोपर्यंत संपूर्णपणे प्रायोगिक कसोटीवर शिद्ध होत नाहीत आणि अजून झालेल्या नाहीत, तोपर्यंत मी त्या मानत नाही. $H_2O$ म्हणजे पाणी. मग जगात कोठेही जा. अशा स्वरुपात या गोष्टी सिद्ध व्हावयास हव्यात. भूत लागणे, भानामती, करणी हा काही वेळा मानसिक आजार असतो आणि बहुदा शुद्ध फसवणूक ! हातातून वस्तू उत्पन्न करणे वा योग सामर्थ्याने त्या हलविणे या गोष्टींना तर माझे जाहीर आव्हान आहे. केवढ्याही मोठ्या माणसाच्या या मागील भोंदूपणा सिद्ध करण्यास मी तयार आहे. भोळ्या भाबड्या जनतेशी त्यांच्या श्रद्धाळू वृत्तीचा फायदा घेऊन त्यांचा वेळ पैसा

---

## भुताची उपपत्ती

रात्रीची वेळ असते. निर्जन जंगलातून एकटा जाणारा माणूस समोर मुंडके नसलेली आकृती बघतो. आकृती मोठी मोठी होत जाते. पावलाचा आवाज न करता पुढे सरकते. अचानक अदृश्य होते. त्या जागी दिसू लागते एक कुत्रे. नंतर तेही अदृश्य होते. भयाण जंगलात एकाकी अवस्थेत ही सारी भुताटकी बघणारा माणूस भीतीने थराथरा कापला नाही आणि घाबरून जाऊन काही बरळू लागला नाही तरच नवल !

हा सारा खेळ परावर्तीत किरणांचा असतो, हे आता सिद्ध झाले आहे. डबक्यातील, तळ्यातील पाण्याच्या चकाकत्या पृष्ठभागावरून वा चकाकणाऱ्या पाचोळ्यावरून चंद्राची किरणे परावर्तीत होतात. काही फर्लांगावर वा मैलाच्या अंतरावर चालणाऱ्या व्यक्तीला त्या डबक्याजवळ वा पानांच्या ढिगाशेजारी उभ्या असलेल्या माणसाची दुसरी आवृत्ती दिसू लागते. त्या तळ्यापासून व्यक्ती दूर दूर गेल्यावर तिची प्रतिकृती मोठी मोठी होत जाते. व्यक्ती किरणाच्या परावर्तनाच्या टप्प्यापलीकडे गेल्यावर ही आकृती अर्थातच नाहीशी होते. याच वेळी त्या डबक्याजवळ येणारे एखादे कुत्रे त्या व्यक्तीची जागा घेणे अशक्य नाही. घडत असलेल्या या हालचालीचा आवाज दूरवर येणार कसा ? ही सारी शास्त्रीय सत्ये माहीत नसल्याने माणसाच्या मनावर होणारा परिणाम मात्र भूत दिसले आणि त्याने झपाटले असे वाटण्यास पुरेसा असतो.

---

घालविणारे आणि अंधश्रद्धा वाढविणारे हे प्रकार म्हणजे समाजाला कलंक नव्हेत काय ?

' मग, तुम्ही या साऱ्याबाबत काय करायचे ठरविलेत ?'

मोठ्या उत्साहाने आपली कल्पना रघुवीरांनी माझ्यासमोर मांडली. ' मी आणखी दोन-तीन वर्षांत माझे प्रयोग बहुधा थांबवीन. खूप जोरात ते चालत असूनही देवदयेने सर्व समृद्धी भरपूर आहे. मग मी एक सत्य संशोधन मंडळ काढणार आहे. असा गडबड गुंडा कुठे चालू झाला की त्या मंडळाचे आम्ही सभासद तिथे जाणार त्यातील लबाडी उघडकीस आणणार. या साऱ्यासाठी योग्य मोबदला आम्ही जरूर घेऊ. पण या साऱ्या चावटपणाचा छडा लावून तो बंद केल्यावरच. '

' अहो, त्या शिवाजीनगरमध्ये भानामतीचे प्रकार होत होते. घरातल्या तयार केलेल्या छोट्या मुलाकडून. एखाद्या सुपीक टाळक्याच्या तरुणाने आजूबाजूच्या उंच इमारतीवर चढून दुर्बिणीने जरा बारकाईने नजर फिरविली असती तर फरशीवर झोपून सफाईने छोट्या वस्तू बाहेर फेकणारी ही बच्चांची भानामती त्याने कधीच उघडकीला आणली असती. पण हे घडले नाही हे खरे. आमचे मंडळ सुरू झाल्यावर बघा भानामती, आणि भूत पिशाच्च यांना कसे कापरे भरते ते. '

मुलाखत संपवून उठण्यापूर्वी त्या मंडळाचा पहिला सभासद म्हणून माझे नाव नोंदविण्यास मी विसरलो नाही. ■

---

मुलाधार, मणिपूर, अनाहत, अग्नी, विशुद्धी, सहस्त्रदल, ही सहा चक्रे माणसाच्या सूक्ष्म देहाला असतात. (स्वाधिष्ठान हे सातवे चक्र काही जण मानतात. त्याची जागा मणिपूरच्या अगदी जवळ असते.) कुंडलीनी ही शक्ती मूलाधार चक्रात सुप्तावस्थेत असते. कुंडलीने या सात चक्रांना विकसित करून जाते. फार थोडे सामर्थ्यवान लोक कुंडलीनी विकसित करू शकतात.

१. मणिपूर चक्र विकसित झाल्यावर योग्याला संपूर्ण जाणिवेने वासना-देहाचा उपयोग करून भूवर्लोकी वावरता येते.

२. स्वाधिष्ठान चक्र विकसित झाल्यावर तो सूक्ष्मभेदग्राही प्रतिमाग्राहक बनतो.

३. अनाहत चक्र विकसित झाल्यावर दुसऱ्याचे मनोगत ओळखता येते.

४. विशुद्धी चक्र विकसित झाल्यावर माणसाचे श्रवणेंद्रिय दूरवरचे ऐकू शकते.

५. अग्निचक्र विकसित झाल्यावर योग्याची दृष्टी खूप लांबचे पाहू शकते.

६. सहस्त्रदल विकसित करून गेल्यावर अणिमा-गरिमादी सर्वसिद्धी त्याला प्राप्त होतात.




# या साऱ्या प्रकाराकडे बघण्याचा परदेशी आणि आपला दृष्टिकोन यात मूलभूत फरक आहे....

— डॉ. देबसिकदार

डॉक्टरांची मुलाखत घ्यायला मी खूपच उत्सुक होतो. त्यांच्या हाताखाली मी शिकलो हे त्याचे एक कारण होते. त्यांच्या कृपामयी नर्सिंग होम या दक्षिण महाराष्ट्रातील अग्रगण्य मानसोपचार केंद्रात विविध प्रकारचे मानसिक रोगी मोठ्या प्रमाणावर यशस्वी उपचार करून घेतात, हे मला माहीत होते. विवेकानंद वाङ्मयाचा व तत्वज्ञानाचा त्यांचा अभ्यास गाढा आहे ही गोष्टही या विषयाच्या पार्श्वभूमीवर उपयुक्तच होती.

त्यांच्यामते मानसिक रोग हे शारीरिक रोगापेक्षा काही वेगळे प्रकरण आहे, ही जाणीव सर्व जगात पहिल्यांदा भारतातच झालेली आढळून येते. अंगात येणे, भूत लागणे, चेटूक करणे या साऱ्या गोष्टींवरून बघण्याचा आपला आणि परदेशी दृष्टिकोन यात एक मूलभूत फरक आहे. देवदेवतांच्या सामर्थ्यावरील धार्मिक श्रद्धा, त्या आपल्या कामना पूर्णही करतात आणि वेळप्रसंगी आपणास शिक्षाही करतात, हा भारतात विश्वास आहे. म्हणूनच मुळात, पवित्र असलेल्या शक्तीची ही करामत आहे, असे आपणाकडे बहुधा मानतात. परदेशात मात्र ही सैतानाचीच कृत्ये समजण्यात येतात. अर्थातच या प्रकारांचे नेमके स्वरूप हे त्या व्यक्तिच्या संस्कारावर आणि तिच्या सामाजिक पार्श्वभूमीवर ओळखावे लागते.

भानामती या प्रयोगाचा उपयोग अवघड प्रसंगी स्वतःचे संरक्षण करून घेण्यासाठी गमतीदार पद्धतीने केला जातो. आजूबाजूच्या लोकांचा या गोष्टीवर विश्वास असल्याने हे अधिक सोपे जाते. सरांच्याकडे एक अविवाहित तरुण गरोदर स्त्री आणली होती. तिच्या उदरात वाढणारा गर्भ हे भानामतीचेच कृत्य आहे अशी खात्री तिच्या नातेवाईकानाही पटली होती. बाईचे अंग तापते. पोट विस्तवासारखे



डॉ. देवसिकवार
(उजवीकडे)

लाल होते, हाताला चटका बसतो आणि कधी अंगावरचे कपडेही पेटतात अशा तिच्याबद्दल तक्रारी होत्या. या साऱ्या गोष्टी भानामतीमुळेच घडतात ह्या गोष्टी-वर गावातल्या काही वैद्यकीय पदवीधरांनीही विश्वास व्यक्त केला होता. गोंधळ वाढण्यापलीकडे यातून काय साधले ? सामाजिक निंदेपासून बचाव करण्यासाठीच ह्या सारा बनाव रचला होता हे पूर्ण तपास करून डॉक्टरांनी उघडकीला आणले. पोट गरम लागणे, हाताला चटका बसणे याचा अनुभव सरांना कधीच आला नाही. कदाचित् ही सारीच काही चलाखी असावी किंवा शंभरवेळा खोटे सांगून बनविल्यामुळे आणि लोकांचा विश्वास या गोष्टींवर अधिक चटकन बसत असल्या-मुळे लोकांना ते खरे वाटावयास लागले असावे. काही घटना वा वस्तू या बाबी आपले असेच ग्रह तयारच झालेले असतात. लिंबावरचा विश्वास हा असाच खूप शतकांचा विश्वास आहे. लग्नात तलवारीवर लावून लिंबू ठेवतात ते अभद्रापासून रक्षण करण्याच्या कल्पनेनेच. भूत उतरविण्यासाठी स्वतःचे संरक्षण करण्यासाठी किंवा कोणाचा सूड घेण्यासाठी लिंबाचा उपयोग करतात. पिशाच्च लिंबामध्ये बंदिस्त करता येते ही शतकानुशतकांची आंधळी श्रद्धा आहे. माणसाच्या मानसिक तोल ज्यावेळी भूत लागणे वा या स्वरुपाच्या प्रकाराने अधिच गेलेला असतो त्या वेळेस तर या स्वरुपाच्या उपचारावरची त्याची श्रद्धा आणखीनच वाढते. लिंबू उतरवून टाकल्यावर जर माणसाला बरे वाटले तर त्याचा अर्थ या लिंबामध्ये भरून तुझी पीडा फेकून दिली या त्याला मिळणाऱ्या Suggestion ला असतो. त्याची अंधश्रद्धा भूत लागणे आणि ते लिंबाच्या सहाय्याने उतरविणे या दोन्ही-गोष्टींवर असल्याने ही गोष्ट त्याला सहजपणे पटू शकते. बाळंतिणीला लागणारे

भूत म्हणजे Perpeural Psychosis हा तर अनेक ठिकाणी आढळणारा आजार. यामध्ये होणारे खरे खोटे भास हा सगळा मानसिक बिघाडाचा आणि उपचाराने सहजपणे सावरल्या जाणाऱ्या आजाराचा भाग आहे.

माणसाच्या शरीर प्रकृतीत ज्या बदलाचे कारण सापडत नाही अशा अनेक गोष्टींना दैवी सामर्थ्याचा खेळ असे समजले जाते. माणसाची बदललेली मानसिक अवस्था ह्या गोष्टी घडवून आणू शकतो. ही गोष्ट लक्षातच घेतली जाते. माणूस अचानक आंधळा, बहिरा झाला, अर्धांगवायूने शरीर लुळे पडले आणि तज्ञ डॉक्टरांच्याकडून तपासणी करून घेतल्यावर काहीच निष्पन्न झाले नाही तर कोणी-तरी करणी केली वा मूठ मारली असे समजले जाते. देवदेवतांचे व साधूबैराग्याचे उपचार केले जातात. काहींना गुण आला तर मग विचारावयासच नको. मानसोपचार तज्ज्ञ सहजपणे या गोष्टीत खूपच मदत करू शकतो अशी असंख्य उदाहरणे सरांनी हाताळला आहेत.

अर्धांगवायूने एक बाई तीन महिने हॉस्पिटलमध्ये अंथरुणावर खिळून होती. उपचारांचा काहीच उपयोग होत नव्हता. अर्धांगवायु ज्या एका कारणाने होऊ शकतो, तो हृदयाचा रोग (Mitral stenosis) त्या बाईस असल्याने रोगाची कारणपरंपराही बरोबर लागली होती. सरांचा संबंध काही कारणाने या केस-बरोबर आला. त्या बाईचे मनःपृथ्थकरण डॉक्टरांनी केले. एक संपूर्ण वेगळी कारण-परंपरा लक्षात आली. ज्या माणसाशी लग्न करावयाचे नव्हते त्या पुरुषाशी इच्छे-विरुद्ध त्या स्त्रीचा विवाह झाला होता. जबरदस्तीने नवऱ्याशी झालेल्या समागमाचा तिच्या मनावर एवढा परिणाम झाला की मनाची घडी पार विसकटून गेली. त्या भयंकर प्रसंगातून सुटका होण्यासाठी तिला अर्धांगवायू झाला. त्याचे मूळ ह्या बिघडलेल्या मनःस्थितीत होते. रोग हे सोंग नव्हते. अगदी खरा प्रकार होता. पण रोगाचे मूळ होते मानसिक. ते दूर करताच थोडेच दिवसात ती तरुण स्त्री चांगली हिंडू फिरू लागली. हेच काम जर एखाद्या मांत्रिकाने वा साधू महाराजाने केले असते तर त्याच्या दैवी शक्तीच्या प्रभावाचा केवढा गाजावाजा झाला असता ?

लग्नानंतर काही वर्षांनी परीक्षा फॉर्मवर स्वतःचे संपूर्ण नाव लिहिताना एका तरुणीचे डोळे एकदम आंधळे झाले. नेत्रतज्ञाने कसून तपासणी केल्यावरही काहीच दोष सापडला नाही. वैवाहिक जीवनात नवऱ्यामुळे भोगावयास लागलेल्या अनेक व्यथा वेदनांचा आणि अपेक्षाभंगाचा ताण त्या स्त्रीच्या अबोध मनात खूप खोलवर झालेला होता. स्वतःचे संपूर्ण नाव लग्नानंतर प्रथमच लिहिताना त्याची प्रकर्षाने जाणीव होऊन स्वप्नभंगाची ती असह्य मानसिक वेदना अशा रीतीने व्यक्त झाली. यामुळेच आठवड्यांच्या सरांच्या मानसोपचाराने तिला पूर्ववत दिसू लागले.

मंत्र, तंत्र, प्रार्थना, पूजा, या साऱ्यांचा उपयोग मानसोपचारतज्ज्ञाच्या उपा-यांच्या व बोलण्याच्याप्रमाणेच काही वेळा होऊ शकतो आणि रोगी बरा होतोही. या प्रकारात एक फार मोठा धोका असतो. हे बरे वाटणे वरवरचे असते. मूलभूत

मनोरचनेत झालेल्या बिघाडावरची ती मलमपट्टी असते. त्यामुळेच पुन्हा काही दिवसांनी हा आजार बळावतो. काही वेळा त्याचे पर्यवसान आत्महत्येतही होऊन जाते. यासाठीच अशा रोग्यांच्यावरचे उपचार हे काळजीपूर्वक आणि संपूर्ण रोग नाहीसा करणारे असावे लागतात. झोपेतून उठून नकळत चालत जाणे, रस्त्यावर जाऊन झोपणे, किंवा एका गावाहून दुसऱ्या गावाला जाणे सारे नात्यागोत्याचे संबंध विसरून जाणे. या गोष्टीमागेही भुताटकी जोडली जाते. मानसशास्त्रीय परिभाषेत याला Hysterical Fugue म्हणतात आणि त्यावर योग्य उपचार करून माणूस चांगला बरा होऊ शकतो.

मानसशास्त्रज्ञ हे नेहमीच भूत विद्या आणि अध्यात्मिक शास्त्र यांच्याशी निगडीत असते. कारण बरोबर वा चुकीच्या पद्धतीने या दोन्ही गोष्टींचे विचार यात घुसविलेले असतात. मात्र हा निरक्षीर विवेक मानसोपचार तज्ज्ञाने करावयास हवा. तेच त्याचे या संदर्भात खरे काम आहे. ■


या सिद्धी तुम्ही पण प्राप्त करू शकता हे ठामपणे सांगणारा ग्रंथ

# मोहिनी विद्या

## साधना व सिद्धी

लेखक : अ. ल. भागवत, मॅनेजर, राजवाडे बँक लि., धुळे

मोहिनी विद्या म्हणजे नुसते झोप आणण्याचे शास्त्र नसून मानवी जीवनात अन्य व्यक्तीला वश कसे करून घ्यावे; सर्व जगाला आपले गुलाम कसे बनवावे वगैरे आश्चर्यकारक सिद्धी प्राप्त कशा करून घ्याव्यात, आपल्या मनात असलेले संकल्प कसे सिद्ध करावेत या विषयी संपूर्ण माहिती या ग्रंथातून मिळेल. यातील काही गुप्त साधना गुरुकृपेने प्राप्त झाल्या असून त्यांच्या आज्ञेनेच त्या प्रथम प्रकट करीत आहोत.

**मूळ किंमत १० रुपये – सवलतीची किंमत ६ रु.**

१२ ऑगस्टपर्यंत ६ रुपये भरणाऱ्यांस ग्रंथ सवलतीत मिळेल. ग्रंथ १५ ऑगस्टला प्रसिद्ध होईल. आपल्या शहरातील ग्रंथ विक्रेत्याकडे रक्कम भरून नोंद करता येईल. पोस्टाने ग्रंथ मागविणाऱ्यांनी १ रु. जादा पाठवावा.

प्रकाशक : श्रीगजानन बुक डेपो

कबुतरखाना, दादर मुंबई २८.

# भूत लागलेले सर्व रोगी मानसोपचाराने बरे झाले नाहीत तरी त्यामुळे शास्त्र खोटे पडत नाही.

**– डॉ. देव**

शारीरशास्त्रात न बसणाऱ्या रोगांच्यावर बाहेरचे उपचारच प्रथम केले जातात. अगदी सुशिक्षित लोकही याला अपवाद नाहीत. या उपचारांचा फोलपणा सिद्ध झाला की मग लोक मानसोपचार तज्ज्ञांकडे धाव घेतात.

यापैकी बरेचसे रोगी हे Schizophrenia या प्रकारातील असतात. त्यातही विशेषत: Paranoid प्रकारचे. कोणीतरी आपल्यामागे लागले आहे, वाईटावर आहे, जेवणात विष कालवले आहे अशी त्यांची भावना झालेली असते. कोणीतरी दैवी शक्ती आपल्या विचारांचे नियंत्रण करते आहे अशीही भावना काही कारणाने मनात उत्पन्न होते.

मनोरचनेच्या बिघाडातून निर्माण झालेल्या या साऱ्या कल्पना कोणत्या तरी मानसिक आघाताने वर उसळून येतात. भूत लागणे, झपाटणे वा देवी अंगात येणे अशी संज्ञा त्याला दिली जाते. खेडेगावात शत्रुत्व करणारे गट असतात. वडिलांना दिलेला दम मुलाने ऐकलेला असतो. रानातून संध्याकाळी परतताना वा पाणवठ्याहून येताना चित्रविचित्र सावल्या, वाढत जाणारा काळोख, एखादे पक्षाचे वा इतर कोणाचे वेगळ्या आवाजातले ओरडणे त्यामुळे आधीच बिघडलेल्या मनाचा तोल संपूर्णपणे ढळतो. मग सोयीप्रमाणे त्याचे अर्थ लोकांच्याकडून लागले जातात.

अंगात येणे हा प्रकार Dissociate Personality या विभागात मोडतो. पौर्णिमा, अमावास्येला वरील सर्वच प्रकार अधिक होतात, हा दावा माझ्या मते अशास्त्रीय आहे. तीन हजार रोग्यांच्या येरवडा मानसिक रुग्णालयात नोंद ठेवूनही पौर्णिमा, अमावास्येला अशी कोणतीच वाढ झालेली आढळली नाही. देवतांच्या वा पिशाच्चांच्या नावाखाली जी बरीवाईट कृत्ये, व्यक्ती अशा वेळी करते ती बहुधा त्या वेळेपुरत्या दुभंगलेल्या त्याच्या व्यक्तिमत्त्वाचाच भाग असतात.

मांत्रिक ज्या पद्धतीने या सर्व गोष्टींवर उपचार करतात त्या सर्व गोष्टी रोग्याच्या मनाला दिलेल्या सूचना ( Suggestion ) असतात. धूप, अंगारे अथवा गुरुचरित्राची पोथी वाचणे हे सर्व या प्रकारातलेच. आफ्रिकेत Black Magic

White Magic या प्रकाराने भूत उतरविणें वा इतर जे प्रकार केले जातात त्यामध्यें हेच सूत्र नकळत वापरलेले असते. दुबळ्या व्यक्तिमत्त्वामुळे बिघडलेला मानसिक तोल त्या माणसाभोवती फेर धरून केलेल्या नाचगाण्यांनी, पूजाअर्चेनी मंत्र आणि अंगारे यांनी त्या माणसाला जी सुरक्षितता वाटते, त्यामुळे परत येतो आणि त्याचे भूत उतरते.

भूत लागलेले सर्व रोगी मानसोपचाराने बरे झाले नाहीत तरी त्यामुळे शास्त्र खोटे पडत नाही. हे रोगी Chronic Schizophrenia या प्रकारात मोडतात आणि त्यांचा मानसिक आजार बरा होण्यापलीकडे गेलेला असतो.

रोग्याशी बोलणे, मनोविश्लेषण ही या रोगावरची प्राथमिक उपाययोजना असते. निरनिराळ्या प्रकारची औषधे त्याबरोबर वापरली जातात. काही रोग्यांना इलेक्ट्रिक शॉक किंवा Insulin शॉकची गरज लागते. हे शॉक मेंदूमध्ये Hypothalamus Nuclaei या जागी परिणाम घडवितात, अशी कल्पना आहे. मात्र कोणत्या पद्धतीने आणि कोणत्या विशिष्ट जागी हे परिणाम घडून येतात हें सांगण अवघड आहे. ■


---

## सिझोफ्रेनिआ

ब्युलेर या शास्त्रज्ञाने १९११ साली ज्या आजारात माणसाचे व्यक्तिमत्त्व दुभंगते त्यासाठी Schizophrenia ही संज्ञा प्रचारात आणली. या आजारात विचार, भावना आणि आचार यांत वैशिष्ट्यपूर्ण बदल होतात. स्मृती, जाणीव, एकाग्रता व आकलनशक्ती यांमध्ये फरक पडत नाही. माणूस हा वास्तववादी दुनियेतून दूर जातो. काही वेळा स्वप्नांच्या दुनियेतही तो वावरू लागतो. धर्मतत्त्वज्ञान शास्त्र, नैतिकता याबाबत त्याची काही अर्थशून्य परंतु काही वेळा आग्रही मते असतात. स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याला बऱ्याच वेळा अडचण पडते. कल्पनांची गर्दी वा कल्पनांचे दारिद्र्य, रिकामे मन, बोथट भावना व आत्यंतिक भावनाप्रधानता, अनैसर्गिक आणि अशिष्ट वर्तणूक, इच्छाशक्तीची कमतरता, निर्णय घेण्याची दुबळी कुवत, स्वतःच्या मनावर व विचारावर दुसऱ्याचा ताबा असल्याची तक्रार, बालीश वागणे, अशा अनेक प्रकारे हा रोग व्यक्त होतो.

साधारण वा कमी बुद्धिमत्तेच्या १५ ते ३५ मधील व्यक्तींमध्ये, स्त्री-पुरुषात समान प्रमाणात हा रोग आढळतो. अनुवंशिकता, लाजाळू, भावनाप्रधान व्यक्तिमत्त्व, घटस्फोट वा इतर मानसिक ताणाने त्रासलेल्या व्यक्ती, या गोष्टी याला कारणीभूत ठरतात.

---



# एका विचारवंताचे वस्तुनिष्ठ विवेचन

— प्रा. देवदत्त दाभोळकर

१. नेहमीच्यापेक्षा काही वेगळे अनुभव आपल्याला आले आहेत असे कोणी सांगितल्यास त्यांची भोळसट म्हणून वासलात लावता कामा नये किंवा दैवी म्हणून दुबळ्या भक्तिभावाने त्याचा स्वीकारही करता कामा नये.

२. असा एखादा वेगळा अनुभव खरा आहे असे आढळून आल्यास त्याची उपपत्ती मोकळ्या मनाने लावण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

३. असा वेगळा अनुभव देण्याची शक्ती एखाद्याच्या ठिकाणी आहे असे मानले तरी केवळ तेवढ्यासाठी त्याच्या सामर्थ्यापुढे शरण जाणे यात आणि एखाद्या गुंडाच्या शारीरिक बळापुढे नमणे यात काहीही फरक नाही.

४. साधुवृत्तीच्या एखाद्या व्यक्तीच्या ठिकाणी अशी शक्ती आहे, अशी शक्यता मानली तरीदेखील ती व्यक्ती अहंकाराने त्या शक्तीचा वापर वा प्रदर्शन करील ही गोष्ट अशक्य वाटते. असा अहंकाराचा आग्रह ज्या व्यक्तीच्या ठिकाणी दिसेल ती व्यक्ती खऱ्या साधुवृत्तीपासून दूरच आहे असे मानावयास हरकत नाही.

५. अशा अनुभवांची शक्यता एकदम नाकारण्याची वृत्ती या भूमिकेमागे नाही हे स्पष्ट होईल. परंतु शास्त्रांच्या कसोटीला उतरतील असे या प्रकारचे अनुभव आजपर्यंत कोणालाही आलेले नाहीत हे ऐतिहासिक सत्य मात्र या ठिकाणी लक्षात घेतलेले आहे. शास्त्राच्या कसोटीवर उतरणारा असा अनुभव जोपर्यंत प्रत्ययास येत नाही तोपर्यंत या शक्तीवर विश्वास ठेवावयास व तिच्या भजनी लागावयास समाजाला प्रवृत्त करणे हे सामाजिक दृष्टीने अत्यंत अहितकारक असे वर्तन होय. ■

# फलित काय ?

कुठल्याही परिसंवादाचे फलित काय ? You are Coufused but at a higher Level. पर्वताच्या अधिकाधिक उंचीवर गेल्यावर अधिक आसमंत दृष्टी-पथात येतो. पण म्हणून काही सारी पृथ्वी दिसत नाही. विचारांच्या उंचीबाबतही असेच म्हणता येईल.

विश्वातील सर्व ज्ञानाला बेटाची उपमा देता येईल. अज्ञानाला त्या बेटाच्या सभोवतालच्या समुद्राची. या ज्ञानाच्या बेटाचा विस्तार वाढतो तेवढा अज्ञानाचा पसारा अधिक दिसतो, कारण त्या सागराच्या अधिक भागाशी वाढलेल्या बेटाचा परीघ निगडीत होतो. वाढते ज्ञान हे नेहमीच असे वाढत्या अज्ञानाशी निगडीत होत असते.

भुते-खेते, भानामती, मंत्रतंत्र दैवी शक्ती या साऱ्या गोष्टीभोवती अजूनही गूढतेचे दाट वलयच आहे. भारतासारख्या ज्या देशात विपुल प्रमाणात या गोष्टी आढळतात तेथे या विषयाचे शास्त्रीय संशोधन जवळजवळ नाहीच. ( राजस्थान विद्यापीठातील अपवाद वगळता, ) समाजप्रबोधन संस्था व जादूगार रघुवीर यांनी एक प्रकारे केलेले आव्हान व श्री. दत्ता बाळ यांनी केलेले आवाहन याबाबतची वैज्ञानिक कसोटी देण्याचे, कोणी स्वीकारले तर खरोखरच तो स्तुत्य उपक्रम ठरू शकेल. अर्थात अशा काही व्यक्ती या प्रयत्नात अयशस्वी ठरल्या तरी या गोष्टींचे अस्तित्व नाहीच, असे ठामपणे म्हणता येणार नाही. पण यातून विचारमंथनास, अधिक नेमक्या प्रयोगास व भोळसटपणा कमी होण्यास मदत होईल.

हातातून तांदूळ आणि सोने निर्माण करणाऱ्यांनी तांदुळाच्या गोणी वा सोन्याचे साठे निर्माण करावेत, हा आग्रह बरोबर नाही. देशाला गरज आहे मग, हे सिद्ध पुरुष का नाही सोन्याचा पाऊस पाडत ? हा प्रश्न माझ्या मते अप्रस्तुत आहे. तो ज्याच्या त्याच्या इच्छेचा व कुवतीचा प्रश्न येतो. मुळात सिद्ध व्हावयास पाहिजे की, असा एखादा तांदुळाचा दाणा तरी निर्माण करता येतो ही किमया. किंवा योगाच्या सहाय्याने शक्य असणाऱ्या अनेक सिद्धींपैकी एखादी सिद्धी. या गोष्टी ज्यामुळे घडतात ती त्या मागची मूळ प्रक्रिया व शास्त्रीय बैठक ज्या वेळी कळेल त्या वेळी उत्तमच. आज तरी सध्याच्या विज्ञानाच्या प्रगतीत ही गोष्ट खूप अवघड वाटते. पुन्हा काही गोष्टी प्रयोगशाळेत सिद्ध करता येतातच असे कोठे आहे ?

आपल्या मुलावर तुमचे प्रेम आहे हे रूढ पद्धतीने वैज्ञानिक निकषावर कसे सिद्ध करणार ?

या प्रश्नांना दुसरीही महत्त्वाची बाजू आहे.

साप चावल्याचे उदा. घ्या. मांत्रिकाच्या मंत्राने आणि देवाच्या प्रदक्षिणेने विष उतरविण्याचे प्रकार बहुसंख्य ठिकाणी आजही दिसतात. खेडेगावातून रोगी हॉस्पिटलला येण्यापूर्वी देवळात हलविला जातो. अनेक सुशिक्षितही 'याही प्रकारात काही तथ्य असेल बरे' असे गुळमुळीत बोलताना आढळतात. यात्र या तथ्याचा शास्त्रीय शोध घेण्याची वृत्ती आढळत नाही. हे सारेच चीड आणणारे आहे. या गोष्टीने सिद्ध करणारा कोणताही पुरावा अजून मिळालेला नाही. ८०। साप असतात बिनविषारी, बदलत्या ऋतुप्रमाणे त्यांचे विष कमी जास्त होते. इतरही अनेक गोष्टींवर सर्पदंशाचे परिणाम अवलंबून असतात. साप चावलेल्या ज्यांना मांत्रिक बरे करतो ते सर्व उपचार न करताही बरे होणारे असतात. त्याच्यापुढेही जाऊन मंत्राच्या जपाने आणि कडक व्रतवैकल्याने ही शक्ती येते असे क्षणभर धरून चालू. पण ही सारी साधना करत बसणे आणि त्याचे स्तोत्र माजवून इतर बाबतीत लोकांच्या दैववादी भोळ्या वृत्तीचा फायदा उठविणे कितपत योग्य ? चार इंजक्शने आणि चार प्रथमोपचार यांची माहिती घेतली आणि लवकर उपचार झाले तर दंशापासून शंभर टक्के सुटका होते. आम्ही सुशिक्षित हे कधी मान्य करणार आणि भोळ्या भाबड्यांना कधी समजणार ? अशा प्रकारावर विश्वास ठेवणे आणि त्याचा प्रचार करणे हा गुन्हा मानावयास नको का ? औषध (Antisnake Venem) योग्य वेळेत मिळाले तर हमखास गुण येतो. त्या उपचारांना या मूर्ख समजुतीने दिरंग होतो. व्यक्तिच्या जीवाबरोबरच हा खेळ नाही का ?

याचा अर्थ असा की प्रथम मंत्राने विष उतरविणे आणि पुनर्जन्म वगैरे गोष्टी सिद्ध व्हावयास हव्यातच पण त्यानंतरही त्यांचा विचार वास्तववादी भूमिकेवरूनच झाला पाहिजे. मरणोत्तर अस्तित्व आणि त्या मागोमाग येणारा पुनर्जन्म याबद्दल या भूमिकेची किती गरज आहे, हे सहज ध्यानात येऊ शकेल. पुनर्जन्म हे जणू शास्त्रीय सत्य आहेच असे जाहीर करण्याची घाई अनेक जणांना झाली आहे. या बाबतचे संशोधन अत्यंत प्राथमिक अवस्थेत व अपुरे असल्याने हा उतावळेपणा कशाला ? पुनर्जन्म सिद्ध झाला की मग गतजन्मीच्या पापपुण्याच्या हिशेबाने या जन्मातील सामाजिक उच्चनीचता सुखदुःखे मिळतात या भूमिकेला दुजोरा मिळेल म्हणूनच का ? आज जे लोक ज्या अशास्त्रीय पद्धतीने पुनर्जन्म सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहेत यावरून ही स्वार्थी भूमिका त्यांच्या मनात असावी, या संशयाला पुष्टी मिळते. म्हणूनच जरी पुनर्जन्म सिद्ध झालाच तरीही या समाजातील दुःखाचे मूळ येथल्या परिस्थितीतच आहे आणि ते शोधले पाहिजे, बदलले पाहिजे, याचा आग्रह आपण कायम ठेवावयास हवा.

आज काय दिसते ? शास्त्रीय संशोधनातून निघणारे निष्कर्ष रूढ समजूतीना धक्का देणारे असतात. पण तथाकथीत पंडिताची त्यावरील मखलाशी मोठी बोलकी असते. आपल्या सोईसाठी ते अर्थ लावतात नेमके उलटे. ते म्हणतात–भूत लागल्यावर मांत्रिक त्याच्या उपचाराने ते उतरवितो, मानसशास्त्रज्ञ त्याच्या पद्धतीने ते घालवितो. थोडक्यात काय, भूत घालविण्याचे हे दोन प्रकार आहेत. भूत लागलेलेच नसते हे यावरून कसे सिद्ध होईल ? राष्ट्राच्या प्रगतीसाठी वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारणें ही फक्त घोषणाच ठरावी का ?

या प्रश्नांची सामाजिक बाजू अधिक गंभीर आहे. समाजात आर्थिक सामाजिक व इतर अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. मात्र त्यापलीकडची मानसिक शांती ही आजच्या युगात गरज होऊन बसली आहे. जे लोक अनेक प्रकारचे चमत्कार दाखवितात त्यांना ही मानसिक उन्नती व शांती साधनेने प्राप्त होते आणि त्याबरोबरच सहजपणे ह्या सिद्धी त्यांना विनासायास मिळतात, असा समज समाजात प्रसृत केला जातो. या गोष्टी स्वतःच्या सामर्थ्याची चुणूक म्हणून ते समाजास दाखवितात. त्यावरून त्यांची उच्च अध्यात्मिक व मानसिक पातळी लक्षात येऊन मनाच्या शांतीसाठी धडपडणारा समाज त्यांच्या मागे जातो. या सर्व प्रकारात काही चुकते आहे, असे बहुसंख्य सुशिक्षितांना वाटतच नाही. पहिली चूक म्हणजे ज्यांची मानसिक पातळी एवढी उंच झाली आहे. त्यांनी या सवंगपणे सिद्धीचा उपयोग करणे – जसे आज ते करीत आहेत. निश्चितच अहितकारक. दुसरे म्हणजे विकसनशील आत्म्याची मुख्य खूण कोणती ? माझ्या मते समाजाचे प्रत्यक्ष दुःख दूर करण्यासाठी धडपडणे. स्वतःच्या साधनेचा भाग म्हणून गोरगरीबांच्या झोपडीत मुक्काम टाकणारा एखादाच गाडगे महाराज. बाकीच्या बहुतेक सर्वांच्या भोवती श्रीमंत आणि सुखवस्तु लोकांचेचकडे दिसते. त्याच्यातच हे लोक गुरफटलेले

---

## प्रायोगिक कसोटी ?

आज शास्त्रीय ज्ञानाने ज्या चमत्काराची काहीही उकल करून सांगता येत नाही असा एखादा दैवी चमत्कार आपण करू शकतो असा कोणाही व्यक्तीचा दावा असल्यास त्याची संपूर्ण शास्त्रीय कसोटी द्यावयास ती व्यक्ती तयार असेल तर अशा कसोटीसाठी आवश्यक ती सर्व सिद्धता करण्याचे कार्य समाजप्रबोधना संस्था करू शकेल असे प्रा. दाभोळकर. प्राचार्य फर्ग्युसन कॉलेज यांनी त्या संस्थेचे मानद, कार्यवाह या नात्याने सांगितले. या विषयाचा पत्रव्यवहार मानद, समाजप्रबोधन् सस्था, ४३०–३१ शनिवार पेठ, पुणे ३० या पत्त्यावर करावा.

---

असतात. षड्रिपु जिंकणे ही अध्यात्मिक उन्नतीची प्रमुख खूण. हे सारे महाराज आणि स्वामी चिकित्सक बुद्धीने त्यांच्यावर काही आक्षेप घेतले की एवढे का खवळतात ? विकास झालेल्या त्यांच्या मनाची वृत्तीही प्रतिगामी असते. ती तशी नाही असे ते कितीही म्हणाले तरी प्रत्यक्ष संघर्षाच्या वेळी ते नेमके पळच काढतात.

विश्वशांती यज्ञाचे उदा. घ्या. हजारो मण धान्य आणि हजारो किलो तेल, तूप यांची आहुती यात भुकेकंगाल देशात विश्वशांतीच्या नावावर देण्याच्या कल्पनेला यापैकी कोणत्याही महाराज, स्वामी बाबा, यांनी विरोध केल्याचे माझ्या माहितीत नाही. धर्म आत्मोन्नती, मनःशांती, असल्या नावावर चाललेली ही भोंगळ आणि समाजविरोधी कृत्ये धर्म आणि मनोविकास याचा प्रसार करणाऱ्यांनी या गोष्टींना जाहीर विरोध करावयास नको का ? यांची शास्त्रीय दृष्टी यावेळी कोठे जाते ? निषेधाची बात सोडाच. पण यापैकी बहुतेक सर्वजण याचा पुरस्कार आणि आचार करतानाच आढळतात. या व्यक्तीच्या मागून जाणारा या अडाणी देशातील बहुसंख्य समाज, मग कोणतीही नवीन दृष्टी घेणे कसे शक्य आहे ? अशा व्यक्तींना समाजात जी विलक्षण मानमान्यता मिळते, अनेक प्रतिष्ठित मान्यवर, समाजाचे नेतृत्व करणारी मंडळी, त्यांच्या भजनी लागतात. त्यामुळे समाजात दैववादी वातावरण मूळ धरते. प्रतिगामी अंधश्रद्धाळू वृत्तीची जोपासना होते. श्रीमंत माणसे स्वतःच्या पापावर पांघरूण घालण्यासाठी धूर्तपणे, आणि गोरगरीब स्वतःच्या जीवनातले वैफल्य विसरण्यासाठी दीनपणे या लोकांचे भक्त बनतात. वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून समाजाचे मुलभूत प्रश्न वस्तुनिष्ठपणे सोडविणे याचा विसर पडला आणि पाडला जातो, या सर्व प्रकारावरचा हा फार मोठा आक्षेप आहे. विज्ञानेश्वराची उपासना करणाऱ्या सामाजिक हिताची काळजी असणाऱ्या आपण सर्वांनी म्हणूनच या प्रकारात निरक्षिरविवेक करावयास शिकले पाहीजे.

■ ■ ■

---

अनेक देशातील अतींद्रीय स्वरुपाच्या अनुभवांचा अभ्यास करून लिहिलेल्या ‘ Extrasensary Perception ’ या गाजलेल्या पुस्तकातील महत्त्वाचा भाग जागेअभावी पुढील अंकी.

---

गिरण्यांबाबतची कारणे असल्याचे मिल ओनर्स असोशिएनचे म्हणणे. पण कापडाचे-ही भाव वाढवून मिळाल्याचे त्यांनी सोयीस्कररीत्या दडवून ठेवले आहे. शिवाय गिरण्यांच्या या अवस्थेला मिल मालकच जबाबदार आहेत हेही सत्य आहे. १८५४ साली कापड गिरणी व्यवसाय हिंदुस्थानात सुरू झाला. म्हणजे आज ११७ वर्षे हा व्यवसाय चालू आहे. पण मालकांनी गिरण्यांची निगा राखण्याकडे हवे तसे लक्ष दिलेच नाही. या व्यवसायातील कोटयावधी रुपयांचा नफा त्यांनी इतर 'सेफ' अशा उद्योगांत गुंतविला. दूध मात्र पूर्णपणे काढायचे पण त्या दुभत्या म्हशीला आवश्यक तितका चाराही खाऊ घालायचा नाही अशी त्यांची वागणूक. मग गिरण्या बंद पडणार नाहीत तर काय ?

अनेक गिरण्यांची मशिनरी जुनाट झाली असून त्या कारणांमुळे व कापूस नाही वगैरे कारणांवरून अनेक कामगारांना घरी पाठवून बिनपगारी रजेवर ठेवणे हा गिरण्यांतून चालणारा नित्याचाच प्रकार.

कामगारांच्या प्रॉव्हिडंट फंडाचे हप्ते न भरणे, कामगार राज्य विमा योजनेचे हप्ते न भरणे, कामगार सोसायटयांचे पैसे भांडवल म्हणून वापरणे ही बंद पडणाऱ्या गिरण्याची लक्षणे.

सहा वर्षापूर्वी एकूण २१ गिरण्यांची चौकशी होऊन त्यांच्या गैरकारभाराचे प्रकार उघडकीस आले होते. बंद पडलेली गिरणी सरकारने चालवायला घेतली की, मग ती चालावी म्हणून कामगारांना काही 'त्याग' करावा लागतो. तो म्हणजे पगार कपातीचा. अशा वेळी काही ठिकाणी–मुंबईबाहेरच्या काही शहरातील गिरण्यात–२६ रु. पगार व २६ महागाईभत्ता यावर मजुरांनी समाधान मानून संसार चालवायचे. सुमारे १० वर्षांपूर्वी सरकारने बंद पडलेली सक्सेरिया गिरणी चालवायला घेतली व कामगार कपातीऐवजी ५०० लोकांची भरती करून, २८ महिन्यांत ९५ लाखांचा नफा मिळविला. पण दुर्दैवाने, कालांतराने ती पुन्हा जुन्या मालकांकडे परत देण्यात आली. परिणाम पुन्हा त्यांना मलिदा खायला मोकळे रान मिळाले आणि तीच मिल आठ महिन्यांपूर्वी पुन्हा बंद पडली. सरकारने ती चालवायला घेण्याचे आश्वासन दिले आणि एक सदस्य चौकशी मंडळ नेमले. मंडळाचा अहवाल येऊनही काही महिने उलटले आहेत. पण गिरणी अजून बंदच आहे. (आज महाराष्ट्र सरकार हे सर्वांत बडे गिरणी मालक बनले आहे. मुंबईतील एकूण ९ व महाराष्ट्रात इतरत्र १० अशा १९ गिरण्या सरकार चालविते. शिवाय कापूस खरेदीचा मक्ताही सरकारकडेच आहे.) उपासमार, आजारीपण, नैराश्य व त्यापायी आत्महत्या वगैरे कारणांनी आजपर्यंत त्या मिलमधील सुमारे १५०

कामगार मेले. बंद पडलेल्या मिलमधील कामगारांना प्रॉव्हिडंट फंडातून थोडाथोडा पैसा चरितार्थ चालविण्यासाठी उपलब्ध करून दिला जातो. पण अनेकांचे फंड गिरणी चालू होईपर्यंत अगदी पार आटून जातात.

ज्युपिटर मिलही चालवायला घेणार असल्याचे सरकारने आश्वासन दिले आहे. पण त्यापूर्वी एक सदस्य मंडळाचा घोळ आहे व नंतर ती गिरणी चालू होईल, पण हे सारे सोपस्कार होईपर्यंत किती महिने लोटतील कोण जाणे! तोपर्यंत कामगारांनी उपाशी मरावे काय? वाटेल ते करावे. अगदीच नाही तर 'समाजवाद झिंदाबाद'च्या वा 'गरिबी हटाओ'च्या आरोळ्या आतड्यांना पीळ पडेपर्यंत माराव्यात. ¤ ¤ ¤

---

पृष्ठ २ वरून...

and Newsweek) the majority of Americans define burning a draft card as 'violence' but they do not define it as violent when a cop clubs a student for doing so. They do not see the violence in sendtng arms to West Pakistan, but if radicals should try to stop such a shipment they would define it as 'violence'. It is unfortunately true that a fairly large portion of the Amcrican public hates 'hippies' and colored people. Thus we Americans–of concience face a very severe question: do we stand with our unbelievably violent American Government and those Americans who still support it–or do we stand with the rest of the world and with those Americans–including students, Black, Red Indians, Mexican–Americans–who have lost faith in the capitalists 'American way of life.' Those of us who have been in the student movement have made our choice. It seems that Mr. Kelman has made a different one.

–(Miss) Gail Omvedt.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. M-H 649

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

छपाई

पूर्ण होत आली.

प्रसिद्धी : १५ ऑगस्ट १९७१